# कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर
## स्थायी समिती सभा क्र.०१ सन २०१७/१८

मंगळवार, दिनांक २३/०५/२०१७

=================== ◎ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ===================

**कार्यवृत्तांत**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या, स्थायी समितीची सभा मंगळवार, दिनांक- २३/०५/२०१७ रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय वसंतराव नाईक सभागृहात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे-

**हजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. शौमिका अमल महाडिक | अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती |
| २. | मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील | सदस्य |
| ३. | मा.सर्जेराव बंडू पाटील (पेरीडकर) | सदस्य |
| ४. | मा.अंबरिषसिंह संजय घाटगे | सदस्य |
| ५. | मा.शुभांगी रामचंद्र शिंदे | सदस्य |
| ६. | मा.विशांत सुरेश महापुरे | सदस्य |
| ७. | मा.राहुल पांडुरंग पाटील | सदस्य |
| ८. | मा.जयवंत गुंडोपंत शिंपी | सदस्य |
| ९. | मा.युवराज दत्ताजीराव पाटील | सदस्य |
| १०. | मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले | सदस्य |
| ११. | मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक निंबाळकर | सदस्य |
| १२. | मा.विजया बाळासाहेब पाटील | सदस्य |
| १३. | मा.कल्लाप्पा सतुराम भोगण | सदस्य |
| १४. | मा.संध्याराणी विलास बेडगे | सदस्य |

येणेप्रमाणे सन्मा.१४ समिती सदस्य, व संबंधीत खाते प्रमुख, अधिकारी उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**मा.अध्यक्ष :-** विषय समितीचे सभापती, मुख्य कार्यकारी अधिकारी, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, समिती सदस्य, सर्व खाते प्रमुख, उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते आजच्या पहिल्या स्थायी सभेचे कामकाज सुरु करुया.

**मा.अरुणराव इंगवले:-**आजच्या सभेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी (सा.प्र.), शिक्षणाधिकारी (प्राथ), शिक्षणाधिकारी (माध्य) इ. अधिकारी उपस्थित नाहीत. सभेमध्ये निर्णय होणार काय ?

**सचिवः-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रशिक्षणासाठी गेले आहेत व त्यांचा तात्पुरता पदभार मा.प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. कोल्हापूर यांच्याकडे आहे व उप मु.का.अ.(सा.प्र.) हे पुर्व परवानगीने रजेवर आहेत व त्यांचा तात्पुरता पदभार माझ्याकडे आहे. शिक्षणाधिकारी (प्राथ) व शिक्षणाधिकारी (माध्य) हे रजेवर आहेत त्यांचे प्रतिनिधी मिटींगसाठी उपस्थित आहेत. सभेमध्ये निर्णय घेता येतील. आजची स्थायी समितीची पहिली सभा असून नवनिर्वाचित मा.पदाधिकारी व स्थायी समिती सदस्य यांचे स्वागत करणेत येणार आहे.

यानंतर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प./सा.प्र.) व उपस्थित खाते प्रमुख यांच्या हस्ते नवनिर्वाचित मा.पदाधिकारी व स्थायी समिती सदस्य यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करणेत आले.

**मा.अरुणराव इंगवले:-** सर्व अधिकारी यांनी आपली ओळख करून द्यावी.

या नंतर उपस्थित सर्व अधिकारी व खातेप्रमुख यांनी आपली ओळख सभागहास करून दिली. तद्नंतर सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प./सा.प्र.) यांनी नविन सभागहास स्थायी समितीची रचना, अधिकार व कर्तव्ये इत्यादी बाबत माहिती दिली.

**सचिव:-** जि.प. सर्वसाधारण सभेनंतर अंत्यत महत्वाची समिती महणजे स्थायी समिती आहे. जि.प.चे अध्यक्ष हे या समितीची पदसिध्द सभापती असतात, मा.उपाध्यक्ष, सर्व विषय समितीचे सन्मा. सभापती व आठ सन्मा. सदस्य या प्रमाणे एकूण १४ सदस्यांची समितीची रचना आहे. सदर समितीचे सचिव हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) आहेत. सभा कामकाजासाठी ५०% (७ सदस्य) कोरमची आवश्यकता असते. समितीस र.रु.२५ लक्ष ते ५० लक्ष पर्यतच्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्याचे अधिकार आहेत. जि.प.कडील विविध समित्यामध्ये होणारे निर्णय मान्यतेकामी स्थायी समिती मार्फत सादर केले जातात. जिल्हा परिषदेच्या धोरणात्मक बाबी व महत्वाचे निर्णय स्थायी समिती सभेमध्ये अवलोकन करुन जि.प. सभेमध्ये मंजूरीस ठेवले जातात. या सभेसाठी सर्व खाते प्रमुख / अधिकारी यांना बोलाविले जाते. तसेच म.जि.प. पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १२० नुसार बाहेरील कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना या सभेस आढावा देणेसाठी बोलाविणेचे अधिकार मा. अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती यांना आहेत.

**मा.अरुणराव इंगवले:-**. माजी आमदार मा.यशवंत एकनाथ पाटील तसेच हातकणंगले पंचायत समितीच्या उप सभापती मा.सुलोचना राजाराम देशमुख यांचे पती मा.श्री.राजाराम महादेव देशमुख यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. तसेच उचगांव जि.प. मतदार संघाचे सदस्य मा.श्री.महेश तुकाराम चौगुले यांच्या मातोश्रींचे अपघाती निधन झाले आहे. तसेच मौजे.आकुर्डे ता.भुदरगड जि.कोल्हापूर येथिल तरूण शेतकरी श्री.अनिल पांडुरंग पोवार व बी न्युजचे रिपोर्टर श्री.रघुनाथ महादेव शिंदे, मु.पो.गारगोटी ता.भुदरगड जि.कोल्हापूर यांचे रानगव्याच्या हल्यात दुःखद निधन झाले आहे. छत्तीसगड राज्यातील सुकमा जिल्हयात ३०० नक्षलवाद्यांनी केलेल्या हाल्यात २५ केंद्रीय राखीव दलाचे जवान (सीआरपीएफ) शहिद झाले आहेत. दुखवटयाचे ठराव आजच्या स्थायी सभेत घेवून त्यांना व ज्ञात अज्ञातांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहूया.

तद्नंतर खालील प्रमाणे दुखवटयाचे ठराव करणेत आले.

**दुखवटयाचा ठराव**

**ठराव क्र. ०१** **दिनांक - २३/०५/२०१७**

कोल्हापूर जिल्हयातील रांगडे व्यक्तीमत्व आणि पन्हाळा, गगनबावडा, वैभववाडी मतदार संघाचे माजी आमदार मा.यशवंत एकनाथ पाटील उर्फ दादा यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी बुधवार दिनांक १७/०५/२०१७ इ.रोजी सांय.७.१५ ला त्यांच्या रहात्या घरी कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर येथे हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे. त्यांनी सलग ५ वेळा २३ वर्षे पन्हाळा, गगनबावडा, वैभववाडी विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केले. कोडोली येथील शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या मा.यशवंत एकनाथ पाटील उर्फ दादा यांनी सुरवातीला वारणा खोऱ्यामध्ये अनेक कुस्त्यांची मैदाने गाजवली आणि त्यांनतर समाजकारण व राजकारणात येऊन ग्रामपंचायत सदस्य, जि.प. सदस्य / जि.प.उपाध्यक्ष असा राजकीय प्रवास करून विधानसभा सदस्य पदावर सलग ५ वेळा व २३ वर्षे कामकाज केले या कालावधीत त्यांनी अतिशय आक्रमकपणे काम करत या तिन्ही तालुक्यांमध्ये अनेक पाणी प्रकल्प मंजूर करून आणले. हे तिन्ही तालुके दुर्गम असल्याने शेती,वीज, पाणी, रस्ते या मुलभूत गरजांसाठी सातत्याने पाठपुरावा केला तसेच त्यांनी यशवंत शैक्षणिक विकास संस्थेची स्थापना करून ग्रामिण भागात उच्च शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या त्यांच्या अकस्मीक निधनाने "वारणेचा वाघ हरपला" अशी जनभावना व्यक्त झाली. मा.श्री.अमर यशवंत पाटील, माजी सभापती शिक्षण व अर्थ समिती, जि.प.कोल्हापूर यांचे ते वडील होत. याबाबत सभागृहाच्यावतीने कै. माजी आमदार मा.यशवंत एकनाथ पाटील उर्फ दादा यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**दुखवटयाचा ठराव**

**ठराव क्र. ०२** **दिनांक - २३/०५/२०१७**

हातकणंगले पंचायत समितीच्या उप सभापती मा.सुलोचना राजाराम देशमुख यांचे पती मा.श्री.राजाराम महादेव देशमुख यांचे सोमवार दिनांक १७/०४/२०१७ इ.रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे. मा.श्री.राजाराम महादेव देशमुख हे वारणा दुध संघाचे जेष्ठ संचालक होते. पं.स. हातकणंगले कडील माजी सभापती श्री.प्रदिप राजाराम देशमुख यांचे ते वडील होत. याबाबत सभागृहाच्या वतीने कै. मा.श्री.राजाराम महादेव देशमुख यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**दुखवटयाचा ठराव**

**ठराव क्र. ०२ अ** **दिनांक - २३/०५/२०१७**

उचगांव जिल्हा परिषद मतदार संघाचे सदस्य मा.महेश तुकाराम चौगुले रा.उचगांव ता.करवीर जि.कोल्हापूर यांच्या मातोश्री सौ.हिराबाई तुकाराम चौगुले यांचे शनिवार दि.६/०५/२०१७ इ.रोजी अपघाती दु:खद निधन झाले आहे. याबाबत सभागृहाच्या वतीने कै. सौ.हिराबाई तुकाराम चौगुले यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**दुखवटयाचा ठराव**

**ठराव क्र. ०३** **दिनांक - २३/०५/२०१७**

मौजे.आकुर्डे ता.भुदरगड जि.कोल्हापूर येथिल तरूण शेतकरी व श्री.दत्तगुरू दुध संस्था आकुर्डे चे अध्यक्ष श्री.अनिल पांडुरंग पोवार, वय ४४ रा. आकुर्डे ता.भुदरगड जि. कोल्हापूर व बी न्युजचे रिपोर्टर श्री.रघुनाथ महादेव शिंदे, वय ५२ रा. गारगोटी ता.भुदरगड जि. कोल्हापूर यांच्यावर शुक्रवार दि.१२/५/२०१७ रोजी आकुर्डे येथील " भैरीचा माळ " या शेतात रानगव्याने हल्ला केला आहे याहल्यामध्ये श्री.पोवार व श्री.शिंदे यादोघांचे अपघाती दु:खद निधन झाले आहे. याबाबत सभागृहाच्या वतीने कै. श्री.अनिल पांडुरंग पोवार व कै.श्री.रघुनाथ महादेव शिंदे यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.कल्लाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**दुखवटयाचा ठराव**

**ठराव क्र. ०४** **दिनांक - २३/०५/२०१७**

छत्तीसगड राज्यातील सुकमा जिल्हयात चिंतागुफा जंगलात नक्षलग्रस्त भागातील रस्ते कामाच्या गस्तीवर असलेल्या केंद्रीय राखीव दलाचे ७४ व्या बटालियनचे जवान (सीआरपीएफ) सोमवार दि.२४/०४/२०१७ रोजी दुपारी १२.१५ वाजता ३०० नक्षलवाद्यांनी भीषण हल्ला केला असून यामध्ये २५ जवान (सीआरपीएफ) शहीद झाले आहेत याबाबत सभागृहाच्यावतीने शहीद जवान (सीआरपीएफ) यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

तद्नंतर सभेमध्ये खालीलप्रमाणे नियमित व आयत्यावेळी दाखल झालेल्या विषयावर चर्चा व ठराव करण्यात आले.

**सचिवः-** आजच्या स्थायी समितीमध्ये नियमित व आयत्यावेळी दाखल झालेले ५२ विषय आहेत. या विषयामध्ये आर्थिक बाबीशी निगडीत असलेल्या विषयांबाबत संबधित खाते प्रमुखांनी अर्थ विभागाची मान्यता घेवूनच या बाबत पुढील कार्यवाही करणेची आहे. व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधित विभागांची राहील.

**विषय क्र. १ - महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके वाचन करणे.**

**सचिवः-** मराठा आरक्षणातील पदांबाबत शासन परिपत्रक प्राप्त झाले असून दिनांक ३/११/२०१७ पर्यत पदे चालू ठेवणेस मुदतवाढ प्राप्त झाली आहे.

**उप मु.का.अ.(बा.क.) :-** आदर्श अंगणवाडयांची निवड करणे बाबतचे प्राप्त शासन परिपत्रकाचे वाचन केले.

**मा.युवराज पाटीलः-** या बाबतचे निकष काय आहेत?

**उप मु.का.अ.(बा.क.) :-** बेसलाईन सर्व्हेव्दारे प्रत्येक जिल्हयातील सर्वसाधारण १४४ अंगणवाडयांची निवड करणेत येणार आहे.

**मा.अरुणराव इंगवलेः-** शासनाकडून प्राप्त झालेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीच्या प्रती संबधित खात्यांनी सभेपुर्वी सभागृहास पुरवाव्यात. तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत सदरची पदे का भरली जात नाहीत. हातकणंगले, शिरोळ तालुक्यात फारच वाईट स्थिती आहे. तसेच तालुक्याकडील कर्मचारी जिल्हास्तरावरील प्रतिनियुक्तीने कामकाज करत आहेत याकारणास्तव तालुक्यातील कामकाजावर वाईट परीणाम होतो तसेच हातकणंगले हा मोठा ब्लॉक आहे तेथील सर्व रिक्त पदे त्वरीत भरणे बाबत कार्यवाही करावी.

**मा.अध्यक्षः**- या बाबत आपण काय करू शकतो ?

**सचिवः-** या बाबत मा.मु.का.अ. यांच्याशी चर्चा करून मार्ग काढता येईल.

**उप मु.का.अ.(बा.क.) :-** कोल्हापूर जिल्हयात सध्यस्थितीत एकूण ३६ अंगणवाडी पर्यवेक्षिकांची पदे रिक्त आहेत सदर पदे हि अंगणवाडी सेविकेतून सरळसेवेव्दारे भरणेची आहेत व सदर भरती प्रक्रीये बाबत मार्गदर्शन व परवानगी शासनस्तरावर दोन वर्षापुर्वी पासून केली आहे. आम्ही या बाबत वारंवार पाठपुरावा करत आहोत.

**मा.अरुणराव इंगवलेः-** सदर रिक्त पदे भरणे बाबत तात्काळ कार्यवाही करावी शासनस्तरावर पाठपुरावा करावा.

**विषय क्र. २ :- विषय समिती मधील घेणेत आलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय क्र.३ :- जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील माहे फेब्रुवारी २०१७ ची जमा खर्चाची पत्रके अवलोकन करणेबाबत (अर्थ विभाग)**

**ठराव क्र. ०५** **दिनांक - २३/०५/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे फेब्रुवारी २०१७ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करण्यात आली. वित्त समितीने दिनांक- ११/०५/२०१७ ने केले शिफारशीनुसार त्यास मंजुरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
अनुमोदक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४:- आजरा तालुक्यातील चव्हाणवाडी ते रा.मा. १३० ला मिळणारा रस्ता ग्रा.मा. ९० कि.मी. ०/० ते १/५०० रस्ता सुधारणा करणे कामातील सुरक्षा अनामत र.रु.२९,७७३/- महसुलात जमा असलेली रक्कम परत करणे बाबत विचार करणे. (बांधकाम)**

**ठराव क्र. ०६** **दिनांक - २३/०५/२०१७**

आजरा तालुक्यातील चव्हाणवाडी ते रा.मा. १३० ला मिळणारा रस्ता ग्रा.मा. ९० कि.मी. ०/० ते १/५०० सुधारणा करणे. या कामाचा मक्ता.श्री.शिवशक्ती म.स.स. मर्या. आजरा ता.आजरा यांनी स्विकारला होता. सदर कामाची पुर्तता झाली आहे.

या कामातील सुरक्षा ठेव रक्कम रु.२९,७७३/- त्यांच्या निरनिराळया बिलातून वसूल करणेत आली होती. सदरची अनामत रक्कम ही वसुल केलेनंतर ती ३ वर्षावरील असलेने व्यपगत करुन महसुलात जमा करणेत आली आहे.

व्यपगत करुन महसुलात जमा करण्यात आलेली रक्कम महाराष्ट्र जि.प.व पं.स. लेखा संहिता १९६८ नियम २०९(८) नूसार मंजूरी देणेचे अधिकार स्थायी समितीचे आहेत. तरी सदरची व्यपगत करणेत आलेली सुरक्षा ठेव अनामत रक्कम रु.२९,७७३/- संबंधीत मक्तेदार.श्री.शिवशक्ती म.स.स. मर्या. आजरा ता.आजरा यांना अदा करणेस मंजूरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५:- मौ.खेडे ता.आजरा येथील अंगणवाडी इमारत बांधणे या कामाची रुपये २२,४८१/- महसुलात जमा असलेली रक्कम परत करणे बाबत विचार करणे. (बांधकाम)**

**ठराव क्र. ०७** **दिनांक - २३/०५/२०१७**

मौ.खेडे ता.आजरा येथील इंगणवाडी इमारत बांधणे या कामाचा मक्ता श्री.भावेश्वरी मजूर सहकारी संस्था मर्या., गजरगाव ता.आजरा जि.कोल्हापूर यांनी स्विकारला असून सदरचे काम पुर्ण झाले आहे.या कामातील सुरक्षा अनामत रक्कम रु.२२,४८१/- त्यांच्या वेळोवेळी सादर केलेल्या बिलातुन वसुल करणेत आली आहे. सदरची रक्कम ३ वर्षावरील असलेने म.जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ मधील नियम २०९(८) अन्वये व्यपगत करुन जि.प.महसुलात जमा करणेत आली आहे.व्यपगत करुन महसुलात जमा करण्यात आलेली रक्कम संबधितांनी मागणी केली आहे.महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ नियम २०९(८) नुसार मंजुरी देणेचे अधिकार स्थायी समितीचे मंजूरीने परत करता येईल. तरी सदरची व्यपगत करणेत आलेली रक्कम रु.२२,४८१/- संबंधीताना अदा करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.६:- मौ.माडवळे ता.चंदगड येथील अंगणवाडी इमारत बांधणे या कामाची रुपये २२,४२१/- महसुलात जमा असलेली रक्कम परत करणे बाबत विचार करणे. (बांधकाम)**

**ठराव क्र. ०८** **दिनांक - २३/०५/२०१७**

मौ.निट्टूर ता.चंदगड येथील पाझर तलाव रस्त्यावर मोरी बांधणे या कामाचा मक्ता श्री.गणेश मजूर सहकारी संस्था मर्या., इब्राहिमपूर ता.चंदगड जि.कोल्हापूर यांनी स्विकारला असून सदरचे काम पुर्ण झाले आहे.या कामातील सुरक्षा अनामत रक्कम रु.२२,४२१/- त्यांच्या वेळोवेळी सादर केलेल्या बिलातुन वसुल करणेत आली आहे. सदरची रक्कम ३ वर्षावरील असलेने म.जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ मधील नियम २०९(८) अन्वये व्यपगत करुन जि.प.महसुलात जमा करणेत आली आहे.व्यपगत करुन महसुलात जमा करण्यात आलेली रक्कम संबधितांनी मागणी केली आहे.महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ नियम २०९(८) नुसार मंजुरी देणेचे अधिकार स्थायी समितीचे मंजूरीने परत करता येईल. तरी सदरची व्यपगत करणेत आलेली रक्कम रु.२२,४२१/- संबंधीताना अदा करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
अनुमोदक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.७:- मौ.कोलीक ता.चंदगड येथील अंगणवाडी इमारत बांधणे या कामाची रुपये १०,२१०/- महसुलात जमा असलेली रक्कम परत करणे बाबत विचार करणे. (बांधकाम)**

**ठराव क्र. ०९** **दिनांक - २३/०५/२०१७**

मौ.कोलिक ता.चंदगड येथील मुख्य रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे या कामाचा मक्ता श्री.जनसेवा मजूर सहकारी संस्था मर्या., कोवाड ता.चंदगड जि.कोल्हापूर यांनी स्विकारला असून सदरचे काम पुर्ण झाले आहे.या कामातील सुरक्षा अनामत रक्कम रु.१०,२१०/- त्यांच्या वेळोवेळी सादर केलेल्या बिलातुन वसुल करणेत आली आहे. सदरची रक्कम ३ वर्षावरील असलेने म.जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ मधील नियम २०९(८) अन्वये व्यपगत करुन जि.प.महसुलात जमा करणेत आली आहे.व्यपगत करुन महसुलात जमा करण्यात आलेली रक्कम संबधितांनी मागणी केली आहे.महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ नियम २०९(८) नुसार मंजुरी देणेचे अधिकार स्थायी समितीचे मंजूरीने परत करता येईल. तरी सदरची व्यपगत करणेत आलेली रक्कम रु.१०,२१०/- संबंधीताना अदा करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
अनुमोदक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.८:- मौ.निट्टूर ता.चंदगड येथील अंगणवाडी इमारत बांधणे या कामाची रुपये २४,९९८/- महसुलात जमा असलेली रक्कम परत करणे बाबत विचार करणे. (बांधकाम)**

**ठराव क्र. १०** **दिनांक - २३/०५/२०१७**

मौ.निट्टूर ता.चंदगड येथील पाझर तलाव रस्त्यावर मोरी बांधणे या कामाचा मक्ता श्री.गणेश मजूर सहकारी संस्था मर्या., इब्राहिमपूर ता.चंदगड जि.कोल्हापूर यांनी स्विकारला असून सदरचे काम पुर्ण झाले आहे.या कामातील सुरक्षा अनामत रक्कम रु.२४,९९८/- त्यांच्या वेळोवेळी सादर केलेल्या बिलातुन वसुल करणेत आली आहे. सदरची रक्कम ३ वर्षावरील असलेने म.जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ मधील नियम २०९(८) अन्वये व्यपगत करुन जि.प.महसुलात जमा करणेत आली आहे. व्यपगत करुन महसुलात जमा करण्यात आलेली रक्कम संबधितांनी मागणी केली आहे.महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ नियम २०९(८) नुसार मंजुरी देणेचे अधिकार स्थायी समितीचे मंजूरीने परत करता येईल. तरी सदरची व्यपगत करणेत आलेली रक्कम रु.२४,९९८/- संबंधीताना अदा करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.९:- ग्रा.पं.कबनुर ता.हातकणंगले कडील ग्रामसभे बाबत. (ग्रामपंचायत)**

**उप मु.का.अ.(ग्रा.पं.):-** या बाबत तपासणी करून चौकशी अहवाल घेतला आहे.

**मा.विजया पाटील:-** ग्रामसभेमध्ये विषय मान्य झाला आहे काय?

**उप मु.का.अ.(ग्रा.पं.):-** या बाबत दिनांक १५/०८/२०१७ च्या सभेमध्ये विषय घेवुन निर्णय घेतला पाहीजे.

**ठराव क्र. ११** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत कबनूर,ता.हातकणंगले येथील सौ.वैशाली अशोक कदम,श्री.फिरोज पापालाल फकीर व कुंदन शिवाजी आवळे यांनी दि.२१/१२/२०१६ रोजी कबनुर ग्रामपंचायत मधील सरपंच,उपसरपंच व ग्रामविकास

अधिकारी यांनी लोकशाहीची चेष्टा करून केलेले बेकायदेशीर कृत्याची चौकशी होऊन त्यांना बडतर्फ करणेबाबतचा तक्रारी अर्ज या कार्यालयाकडे सादर केला आहे.

सदर अर्जाबाबत योग्यती सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अहवाल देणेबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती हातकणंगले यांना दि.२३/१२/२०१६ रोजी कळविले होते. त्यानुसार ग.वि.अ. हातकणंगले यांनी श्री.आर.एम.तळपे, विस्तार अधिकारी (एम.एस.आर.एल.एम.) पंचायत समिती, हातकणंगले व श्री.एस.एस.शिंदे, विस्तार अधिकारी (कृषी) पंचायत समिती, हातकणंगले यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक केली होती त्या अनुषंगाने चौकशी अहवाल दि.१३/०१/२०१७ रोजी या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. सदरचा दिलेला अहवाल चुकीचा आहे व समाधानकारक नाही याबाबत फेरचौकशी होणेबाबतचा अर्ज श्री.कुंदन शिवाजी आवळे व श्री.फिरोज पापालाल फकीर रा.कबनूर ता.हातकणंगले यांनी दि.१६/०१/२०१७ रोजी सादर केलेला आहे. त्यास अनुसरून या कार्यालयाकडील जाक्र. कोजिप/ पंचायत/ कावि-१८/८३५,२७/ २०१७,दि.१६/०१/२०१७ चे पत्रान्वये फेरचौकशीसाठी पंचायत समिती, भुदरगड कडील श्री.के.एस.पाटील, विस्तार अधिकारी (पंचायत) यांची नेमणुक करणेत आलेली होती. त्यानुसार चौकशी अधिकारी श्री.के.एस.पाटील, विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी दि.०३/०४/२०१७ रोजी चौकशी अहवाल सादर केला.

त्यानंतर त्याच कालावधीत दि.०३/०४/२०१७ रोजी अर्जदार श्री.कुंदन शिवाजी आवळे व फिरोज पापालाल फकीर यांनी दि.०७/०४/२०१७ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा देणेबाबतचे पत्र या कार्यालयाकडे सादर केले. सदर चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता ग्रामसभा घेणेमध्ये अनियमितता व त्रुटी असल्याचे दिसून येत आहे. ग्रामसभेमध्ये नियमबाहय कामकाज झालेमुळे सदर सभेमधील विषय पत्रिकेतील विषय क्र. ३,४,व ५ या तीन विषयाबाबत फेर ग्रामसभा घेणेबाबत तात्काळ सुचना देणेबाबत व अर्जदार यांना आत्मदहनापासून परावृत्त करणेबाबत खास दुताकरवी लेखी कळविणेबाबत इकडील पत्र क्र.कोजिप/पंचायत/कावि-१८/२६१/१७, दि.०६/०४/२०१७ ने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांना कळविलेले आहे.

तथापि श्री.सुधीर सात्ताप्पा लिगाडे, अध्यक्ष, महात्मा गांधी तंटामुक्त समिती कबनूर, ता.हातकणंगले यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या अहवालास स्थगिती मिळावी व फेरचौकशी करणेबाबतचा अर्ज सभापती स्थायी समिती तथा अध्यक्ष, जि.प. यांचेकडे दि.१०/४/२०१७ रोजी सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने दि. १०/४/२०१७ रोजीच्या अर्जावर सदरचा विषय स्थायी समिती सभेसमोर ठेवणेत यावा असे निर्देश मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिलेले आहेत. तरी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४२ अन्वये स्थायी समिती कडील निर्देश प्राप्त होईपर्यंत फेरग्रामसभा घेणेबाबतची कार्यवाही करू नये असे इकडील पत्र क्र कोजिप /पंचायत/कावि-१८/२७४/२०१७,दि.११/०४/२०१७ ने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांना कळविले आहे.

दि. २/१०/२०१६ रोजीची ग्रामसभा सुरू असताना सभागृहामध्ये संपूर्ण तणावाचे वातावरण होते असे असताना देखील सभा अध्यक्षांनी विषय पत्रिकेवरील विषय वाचन करणेबाबत ग्रामविकास अधिकारी यांना सुचित केले. अशा परिस्थितीमध्ये सभेचे कामकाज घेता येणार नाही, असे ग्रामविकास अधिकारी यांनी सभा अध्यक्ष यांना सांगितले परंतु अध्यक्ष ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. एकंदरीत चौकशी अधिकारी यांच्या चौकशी अहवालाचे अवलोकन करता व दि.२/१०/२०१६ रोजी पार पडलेल्या ग्रामसभेचे इतिवृत्तांताचे वाचन करता सदरची दि.२/१०/२०१६ रोजीची ग्रामसभा ही सुरवातीपासुनच गोंधळात व तणावपूर्ण वातावरणात पार पडलेली दिसून येत असल्याने सदर ग्रामसभेचे कामकाज नि :पक्ष व नियमित कामकाज झाले आहे असे म्हणता येणार नाही त्यामुळे संदिग्धता राहण्याची शक्यता असल्याने दि.२/१०/२०१६ चे ग्रामसभेसमोरील विषयपत्रिकेवरील विषयाबाबतचे कामकाज पुढील गावसभेमध्ये चालविण्याचे निर्देश महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४२ अन्वये स्थायी समिती सभा देत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१०:- ग्रा.पं.घुणकी ता.हातकणंगले यांना दुकानगाळे बांधकाम करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज रक्कम रु.४३,७६,०००/- मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १२** **दिनांक - २३/०५/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अ.क्र. | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम / मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत घुणकी, ता.हातकणंगले | दुकाने गाळे बांधकाम करणे | ५८,३४,७८६/- | ४३,७६,०९०/- | ४३,७६,०००/- |

२/- वरील ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करण्यात यावी.

१. ग्रामपंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कम ग्रामपंचायत स्वत:च्या फंडातून खर्च करेल व ७५ टक्के रक्कम जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळेल.

२. बांधकामाची नियोजित जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असावी. रस्त्यावर अतिक्रमण करु नये.

३. कर्ज ज्या कारणासाठी मागणी केली आहे. त्याच कारणासाठी खर्च करणेत यावा दुसरीकडे खर्च करु नये.

४. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे. ५ टक्के आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५ टक्के खेरीज द.सा.द.शे. २ टक्के दराने दंडणीय व्याज आकरण्यात येईल.

५. कर्ज परतफेड करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी.

६. कर्ज मिळाल्यापासून ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात यावे.

ग्रामपंचायत घुणकी तालुका हातकणंगले यांना वरील अटीस अधीन राहून दुकान गाळे बांधकाम करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी जि.प.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत यावी ही विनंती.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.११:- ग्रा.पं.दानोळी ता.शिरोळ यांना ग्रामपंचायत इमारत बांधकाम करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज रक्कम रु.१५,५८,०००/- मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १३** **दिनांक - २३/०५/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अक्र | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.पं. दानोळी ता. शिरोळ | ग्राम पंचायत कार्यालय बांधकाम करणे | ७५,७८,४५१/- | २०,७८,४५१/-<br>१४ वा वित्त आयोग - २५,००,०००/- | १५,५८,०००/- |

२/- वरील ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करण्यात यावी.

१. ग्रामपंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कम ग्रामपंचायत स्वतःच्या फंडातून खर्च करेल व ७५ टक्के रक्कम जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळेल.

२. बांधकामाची नियोजित जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असावी.रस्त्यावर अतिक्रमण करु नये.

३. कर्ज ज्या कारणासाठी मागणी केली आहे. त्याच कारणासाठी खर्च करणेत यावा दुसरीकडे खर्च करु नये.

४. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे. ५ टक्के आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५ टक्के खेरीज द.सा.द.शे. २ टक्के दराने दंडणीय व्याज आकरण्यात येईल.

५. कर्ज परतफेड करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी.

६. कर्ज मिळाल्यापासून ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात यावे.

ग्राम पंचायत दानोळी तालुका शिरोळ यांना वरील अटीस अधीन राहून ग्राम पंचायत कार्यालय बांधकाम करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी जि.प.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत यावी ही विनंती

सुचक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१२:- ग्रा.पं.खुपीरे ता.करवीर यांना ग्रामपंचायत इमारत बांधकाम करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज रक्कम रु.२२,४३,०००/- मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १४** **दिनांक - २३/०५/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अ क्र | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम पंचायत खुपिरे तालुका करवीर | ग्राम पंचायत कार्यालय बांधकाम करणे | २९,९१,५९७/- | २२,४३,६९८/- | २२,४३,०००/- |

२/- वरील ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करण्यात यावी.

१. ग्रामपंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कम ग्रामपंचायत स्वतःच्या फंडातून खर्च करेल व ७५ टक्के रक्कम जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळेल.

२. बांधकामाची नियोजित जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असावी.रस्त्यावर अतिक्रमण करु नये.

३. कर्ज ज्या कारणासाठी मागणी केली आहे. त्याच कारणासाठी खर्च करणेत यावा दुसरीकडे खर्च करु नये.

४. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे. ५ टक्के आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५ टक्के खेरीज द.सा.द.शे. २ टक्के दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.

५. कर्ज परतफेड करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी.

६. कर्ज मिळाल्यापासून ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात यावे.

ग्रामपंचायत खुपिरे तालुका करवीर यांना वरील अटीस अधीन राहून ग्राम पंचायत कार्यालय बांधकाम करणेसाठी जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी जि.प.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत यावी ही विनंती

सुचक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१३:- ग्रा.पं.शिंदेवाडी ता.करवीर यांना वॉटर मिटर्स बसविणेसाठी जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज रक्कम रु.५,०९,०००/- मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १५** **दिनांक - २३/०५/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अक्र | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम पंचायत शिंदेवाडी ता. करवीर | वॉटर मिटर्स खरेदी | ६,७९,९००/- | ५,०९,९२५/- | ५,०९,०००/- |

२/- वरील ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करण्यात यावी.

१. ग्रामपंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कम ग्रामपंचायत स्वत:च्या फंडातून खर्च करेल व ७५ टक्के रक्कम जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळेल.

२. वापरणेत येणारे साहित्य हे आय एस आय मार्कचे असावे.

३. कर्ज ज्या कारणासाठी मागणी केली आहे. त्याच कारणासाठी खर्च करणेत यावा दुसरीकडे खर्च करु नये.

४. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे. ५ टक्के आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५ टक्के खेरीज द.सा.द.शे. २ टक्के दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.

५. कर्ज परतफेड करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी.

६. कर्ज मिळाल्यापासून ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात यावे.

ग्राम पंचायत शिंदेवाडी तालुका करवीर यांना वरील अटीस अधीन राहून वॉटर मिटर्स खरेदी करीता जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी जि.प.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत यावी ही विनंती

सुचक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१४:- जिल्हा ग्राम विकास निधीतील ठेव पावतीची मुदत संपलेने रक्कम गुंतवणूकीस कार्योत्तर मंजुरी देणेबाबत तसेच रक्कम रुपये २१,१८,५८,१८४/- (अधिक व्याज) पुर्नगुंतवणुक करणेबाबत. (ग्रामपंचायत)**

**मा.अरुणराव इंगवले:-** जिल्हा ग्राम विकास निधीची रक्कम जास्तीत जास्त कोणत्या बॅकेत आहे.? व ज्यादा व्याजदर कोणत्या बॅकेचा आहे?

**उप मु.का.अ.(ग्रा.पं.) :-** आपले र.रु.१ कोटी ५० लक्ष के.डी.सी.सी. बॅकेत आहेत.

**मा.सभापती (शिक्षण):-** आर.बी.एल.बॅकेशी संपर्क साधून सी.एस.आर बाबत चर्चा करा अधिक व्याजदर मिळणेबाबत प्रयत्न करून पुढील निर्णय घेणेत यावा.

**ठराव क्र. १६** **दिनांक - २३/०५/२०१७**

१. मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६० मधील नियम ५ नुसार जिल्हा ग्राम विकास निधीची रक्कम गुंतवणूक करणेची तरतुद आहे. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचेकडील परिपत्रक दिनांक १६ मे २००२ नुसार **४ ते ६** महिने कालावधी किंवा निश्‍चित अशा मुदतीच्या कालावधीसाठी रक्कम गुंतवणूक करणेत यावी अशा सुचना आहेत.

२. त्या अनुषंगाने जिल्हा ग्राम विकास निधी मधील रक्कम गुंतवणूक करणे आवश्यक आहे. जिल्हा ग्रामविकास निधीमधील काही ठेवी हया कोल्हापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक आचारसहिंता कालावधीत मुदत संपलेने तसेच स्थायी समिती सभेच्या मान्यतेने बँकेत गुंतवणूक न करता आचारसहिंतेचा भंग होणार नाही या दृष्टीकोनातुन जिल्हा परिषदेचे संभाव्य व्याजाचे नुकसान टाळावयाचे असलेने अर्थ विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे अभिप्राय व मान्यता घेवून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांची अंतिम मान्यता घेवून रक्कम रूपये १७,३३,६२,८४५/- दिनांक २१/०२/२०१७ इ रोजी अन्वये सेव्हींग खाती (एस बी ठेव) खाती आर बी एल बँक कोल्हापूर यांचे व्याजदर जास्त असलेने त्यांचेकडे ठेव स्वरूपात गुंतवणूक करणेत आलेली आहे.

३. तसेच, जिल्हा ग्रामविकास निधीमधील काही ठेवी मुदत संपलेने हया स्थायी समिती अस्तित्वात न आलेमुळे स्थायी समिती सभेच्या मान्यतेने बँकेत गुंतवणूक न करता जिल्हा परिषदेचे संभाव्य व्याजाचे नुकसान टाळावयाचे असलेने अर्थ विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे अभिप्राय व मान्यता घेवून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांची अंतिम मान्यता घेवून रक्कम रूपये २,३४,९५,३३९/- दिनांक ३०/०३/२०१७ इ रोजी अन्वये सेव्हींग खाती (एस बी ठेव) आर बी एल बँक कोल्हापूर यांचे व्याजदर जास्त असलेने त्यांचेकडे ठेव स्वरूपात गुंतवणूक करणेत आलेली आहे.

४. मुद्दा क्रमांक २ व ३ ला अनुसरून आर बी एल बँक कोल्हापूर यांचे सेव्हींग खातीचे (एस बी ठेव) व्याजदर हे सर्वात जास्त असलेने जिल्हा परिषदेचे संभाव्य व्याजाचे नुकसान टाळावयाचे असलेने एकूण एकत्रित रक्कम रूपये १९,६८,५८,१८४/- (अक्षरी रू. एकोणीस कोटी अडुसष्ठ लाख अठ्ठावन्न हजार एकशे चौऱ्याऐंशी रूपये फक्त) गुंतवणूक करणेत आलेली आहे.

५. सध्यस्थितीत, केडीसीसी बँकेतील खाली नमुद केलेल्या मुदतबंद ठेव पावतीची मुदत संपलेली आहेत.

| अ. क्र | बँकेचे नाव | पावती क्रमांक | रक्कम | मुदत कालावधी | | व्याजदर | मुदतीनंतर मिळणारे व्याज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यत | | |
| १ | केडीसीसी बँक | १२६३८७ | २०,००,०००/- | २१/०४/१६ | २१/०४/१७ | ८.५०% | १,६९,६७६/- |
| २ | केडीसीसी बँक | १२६३९१ | १,३०,००,०००/- | २७/०४/१६ | २७/०४/१७ | ८.५०% | ११,०२,९४०/- |
| एकूण | | | १,५०,००,०००/- | | | | १२,७६,६१६/- |

६. आर बी एल बँकेतील १९,६८,५८,१८४/- (अधिक व्याज) व केडीसीसी बँकेतील ठेव पावती रक्कम रूपये १,५०,००,०००/- (अधिक व्याज) अशी एकूण रक्कम रूपये २१,१८,५८,१८४/- (अधिक व्याज) गुंतवणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी दिनांक २१/०४/२०१७ व दिनांक २९/०४/२०१७ अन्वये जिल्हयातील सर्व बँकांचे व्याज दर मागणी करणेत आलेली आहेत ते खालिलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | बॅकेचे नाव | ७ ते २९ दिवस | ३० ते ४५ दिवस | ४६ ते ९० दिवस | ९१ ते १८० दिवस | १८१ ते २७४ दिवस | २७५ ते ३६४ दिवस | १ वर्ष मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया | ४.०० | ४.०० | ४.०० | ४.७५ | ४.७५ | ४.७५ | ४.७५ | - |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडिया | व्याज दर अप्राप्त आहेत. | | | | | | | - |
| ३ | के.डी.सी.सी | ५ | ५.२५ | ६ | ७.२० | ७.५० | ८ | ८ | - |
| ४ | देना बँक | व्याज दर अप्राप्त आहेत. | | | | | | | - |
| ५ | सिंडीकेट बँक | ४.५० | ४.५० | ५.०० | ५.२५ | ५.२५ | ५.२५ | ५.५० | - |
| ६ | आय.सी. आय. सी आय | ५.२५ | ५.५० | ५.७५ | ६.०५ | ६.३० | ६.३० | ६.३० | - |
| ७ | आर.बी.एल बँक | ७.२५ | ७.२५ | ७.२५ | ७.२५ | ७.२५ | ७.२५ | ७.२५ | एस.बी. ठेव |

वरिल प्रमाणे व्याजाचा तुलनात्मक तक्ता पाहता

१. १ वर्ष मुदतीसाठी सर्वात कमी व्याज हे बँक ऑफ इंडीया या बँकेचे आहेत. - व्याज दर ४.७५ %
२. १ वर्ष मुदतीसाठी सर्वात जास्त व्याज दर हे के.डी.सी. या बँकेचे आहेत- व्याज दर ८.०० %
३. प्रती दिवसासाठी आर बी एल बँकेचे एस.बी.ठेवीचे व्याज दर - व्याज दर ७.२५ %
४. स्टेट बँक ऑफ इंडीया व देना बँक या बँकेचे व्याज दर हे अप्राप्त आहेत.

वरील तक्त्याचे अवलोकन करून गुंतवणुक करणेबाबत सविस्तर चर्चेअंती केडीसीसी बँकेचे व्याज दर सर्वाधिक म्हणजे वार्षिक ८ % असलेने जिल्हा ग्राम ग्राम विकास निधीची रक्कम रूपये २१,१८,५८,१८४/- (अधिक व्याज) ०१ वर्षासाठी गुंतवणूक करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१५:- ग्रा.पं.घुंगुर ता.शाहूवाडी येथील समाज मंदिर इमारत निर्लेखन करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १७** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत घुंगुर, ता. शाहुवाडी येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर २२१ मधील समाजमंदिर इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत घुंगुर, ता. शाहुवाडी यांचेकडून दि. १७/०६/२०१५ रोजी पंचायत समिती, शाहुवाडी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९९३-९४ साली बांधलेली आहे. सदरची इमारत पुर्ण मोडकळीस आलेली असलेने, सदरची इमारत पाडून त्याठिकाणी नविन इमारत बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.६४, दि. २४/११/२०१४ व ग्रामसभा ठराव क्र. ५६,

दि. २४/११/२०१४ रोजीने ठराव करणेत आलेला आहे. तसेच पंचायत समितीकडील मासिक सभा ठराव क्र. ३३३, दि. १८/०२/२०१६ रोजीने पंचायत समितीने शिफारस देणेत आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. कोल्हापूर यांचेकडून सदरची इमारत पुर्ण मोडकळीस आलेली असलेने भविष्यात वापरास धोकादायक असलेने ते निर्लेखनास हरकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे.

शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ नुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण मोडकळीस आलेली असलेने भविष्यात वापरास धोकादायक असलेने सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. समाजमंदीर इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत घुंगुर, ता. शाहुवाडी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१६:- ग्रा.पं.राधानगरी ता.राधानगरी येथील जुनी ग्रामपंचायत कार्यालय निर्लेखन करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १८ दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत मौजे राधानगरी, ता. राधानगरी येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर ८५६ मधील ग्रामपंचायत कार्यालय जुनी इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत मौजे राधानगरी, ता. राधानगरी यांचेकडून दि. १६/०३/२०१५ रोजी पंचायत समिती, राधानगरी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९७० साली बांधलेली आहे. सदरची इमारतीच्या भिंती फार जुन्या जिर्ण व मोडकळीस आलेल्या आहेत. सदरची इमारत पाडून त्याठिकाणी नविन स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना अंतर्गत कायम स्वरूपी तालुका विक्री केंद्राचे बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.४५दि. १०/०५/२०१५ रोजीने ठराव करणेत आलेला आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारत जिर्ण झालेले असलेने भविष्यात धोकादायक असलेने ते पाडण्यात हरकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ या परिपत्रकातील सर्व अटीस अधीन राहून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे राधानगरी, ता. राधानगरी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१७:- ग्रा.पं.घुंगुर ता.शाहूवाडी येथील ग्राम पंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १९** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत घुंगुर, ता. शाहुवाडी येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर १९६ मधील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत घुंगुर, ता. शाहुवाडी यांचेकडून दि. १७/०६/२०१५ रोजी पंचायत समिती, शाहुवाडी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९९३-९४ साली बांधलेली आहे. सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत आहेत. सदरची इमारत पाडून त्याठिकाणी नविन व्यायाम इमारत बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.९, दि. २४/०४/२०१५ व ग्रामसभा ठराव क्र. ९, दि. ०१/०५/२०१५ रोजीने ठराव करणेत आलेला आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. कोल्हापूर यांचेकडून सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात धोकादायक असलेने ते निर्लेखन गरजेचे असलेबाबतचे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ नुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत घुंगुर, ता. शाहुवाडी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१८:- ग्रा.पं.पडखंबे ता.भुदरगड येथील ग्राम पंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २०** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत मौजे पडखंबे ता. भुदरगड येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर ४४ मधील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत मौजे पडखंबे, ता. भुदरगड यांचेकडून दि. २१/०६/२०१६ रोजी पंचायत समिती, भुदरगड यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९६२ साली बांधलेली आहे. सदर इमारतीच्या भिंतीस तडे गेले आहेत. रुफकाम जीर्ण झालेले आहे. दरवाजे खिडक्या नादुरूस्त असलेने सदरची इमारत कधीही पडण्याची शक्यता आहे. सदरची इमारत पाडून त्याठिकाणी नविन इमारत बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. तसेच निर्लेखनानंतर जुन्या साहीत्याचा लिलाव करून ती रक्कम ग्रामपंचायत फंडात जमा करणेत येणार आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.११ दि. ३०/११/२०१५ व ग्रामसभा ठराव क्र. १८, दि. २६/०१/२०१६ रोजीने ठराव करणेत आलेला आहे.

उप अभियंता, (बांधकाम), पंचायत समिती, भुदरगड यांनी सदर निर्लेखनास शिफारस केलेली आहे. सद्यस्थितीचे फोटो सादर केलेले आहेत. तसेच कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारतीच्या भिंतीस तडे गेले आहेत. रुफकाम जीर्ण झालेले आहे. दरवाजे खिडक्या नादुरूस्त असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने ते निर्लेखन गरजेचे असलेबाबतचे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ या परिपत्रकातील सर्व अटीस अधीन राहून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत पडखंबे, ता. भुदरगड विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१९:- ग्रा.पं.फेजिवडे ता.राधानगरी येथील समाज मंदिर इमारत निर्लेखन करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २१** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत फेजिवडे, ता. राधानगरी येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर २८२ मधील समाजमंदिर इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत फेजिवडे, ता. राधानगरी यांचेकडून पंचायत समिती, राधानगरी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९८९-९० साली बांधलेली आहे. सदरची इमारतीच्या भिंतीना भेगा पडलेल्या आहेत व रुफकाम पुर्णपणे खराब झालेले आहे. सदरची इमारत पाडून त्याठिकाणी नविन सुसज्ज अशी समाज उपयोगी इमारत बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.८ दि. २८/०२/२०१५ रोजीने ठराव करणेत आलेला आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारतीच्या भिंतीना भेगा पडल्या असलेने व रूपकाम भंगलेली असून भविष्यात वापरास धोकादायक असलेने ते निर्लेखनास हरकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ या परिपत्रकातील सर्व अटीस अधीन राहून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत फेजिवडे, ता. राधानगरी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२०:- मौले हालेवाडी ता.आजरा येथील मिळकत नं.६६/३ येथील उंच पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २२** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत मौजे हालेवाडी, ता. आजरा येथील मिळकत नं. ६६/३ मध्ये उंच पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत हालेवाडी, ता. आजरा यांनी पंचायत समिती आजरा यांचेकडे सादर केलेला आहे.

सदर पाण्याची टाकी सन १९७९ मध्ये बांधलेली असून सद्या त्या टाकीस ३७ वर्षे पुर्ण झालेली आहेत सदरची टाकी गेली ७-८ वर्षे वापरात नाही. सध्या पर्यायी नविन महाजल योजनेअंतर्गत गावास पाणी पुरवठा चालू आहे. सदरची टाकीचे काँक्रीट ठिसूळ होवून पडत असून पिलर्स कमकूवत झालेले आहेत. सदरची टाकी नागरी वस्तीच्या मध्यभागी असून टाकी पडून जिवीतहानी होण्याची शक्यता आहे. सदरची जुनी जीर्ण नादुरूस्त पाण्याची टाकीचे निर्लेखन करून टाकी उतरविणेबाबत ग्राम पंचायत हालेवाडीकडील मासिक सभा ठराव क्र. १२, दि. १४/०८/२०१६ व ग्राम सभा ठराव क्रमांक ४, दिनांक ०१/०५/२०१६ ने ठराव पारित केलेला आहे. तसेच पंचायत समितीने ठराव क्र. ४९, दि.१४/१२/२०१६ ने टाकी निर्लेखन करून उतरविणेबाबत ठराव पारित केलेला आहे. उपअभियंता वर्ग -१, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग क्रमांक-४, आजरा यांनी प्रस्तुत विषयी शिफारस पत्र दिलेले आहे. मौजे हालेवाडी, ता.आजरा कडील उंच पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत विहित कार्यपध्दती अवलंबणार असलेने व नियमानुसार निर्लेखनाची कार्यवाही करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२१:- मौजे.नेबापुर ता.पन्हाळा येथील समाज मंदिर निर्लेखन करणेबाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २३** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत मौजे नेबापुर, ता. पन्हाळा येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर २६१ मधील समाजमंदिर इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत मौजे नेबापुर, ता. पन्हाळा यांचेकडून पंचायत समिती, पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९०९ साली बांधलेली आहे. सदरची इमारत काही ठिकाणी पडझड झाली असलेने, सदरची इमारत पाडून त्याठिकाणी नविन इमारत बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.५४, दि. १०/०९/२०१५ व ग्रामसभा ठराव क्र. ६३, दि. ०२/१०/२०१६ रोजीने ठराव करणेत आलेला आहे. तसेच पंचायत समितीकडील मासिक सभा ठराव क्र. १३, दि. १२/०४/२०१७ रोजीने पंचायत समितीने शिफारस देणेत आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारतीच्या दगडी व भेंडामाती भिंतीस तडे गेले आहे. लोखंडी पत्रा रुफकाम जिर्ण झाले असून दरवाजे व खिडक्या नादुरूस्त असलेने, भविष्यात वापरास धोकादायक आहे. सदर इमारतीचे निर्लेखन करणेस हरकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ या परिपत्रकातील सर्व अटीस अधीन राहून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन

करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत नेबापुर, ता. पन्हाळा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२२:- ग्रा.पं. तरसंबळे ता.राधानगरी येथील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणेबाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २४** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत तरसंबळे, ता.राधानगरी येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर ९ मधील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत तरसंबळे, ता.राधानगरी यांचेकडून दि. ४/११/२०१६ रोजी पंचायत समिती, राधानगरी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९७२-७३ साली बांधलेली आहे. सदरची इमारत दगड मातीचे बांधकाम असून सदरच्या इमारतीची डागडूजी करता येत नसलेने इमारतीचे निर्लेखन करून त्याठिकाणी नविन इमारत बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.८, दि. ३०/१०/२०१५ रोजीने ठराव करणेत आलेला आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. कोल्हापूर यांचेकडून सदरची इमारत जिर्ण झालेली असून बसण्यास धोकादायक आहे व भविष्यात वापरास धोकादायक असलेने ते निर्लेखन गरजेचे असलेबाबतचे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ या परिपत्रकातील सर्व अटीस अधीन राहून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत तरसंबळे, ता. राधानगरी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२३:-** ग्रा.पं.वेतवडे ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २५** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत मौ. वेतवडे, ता. पन्हाळा येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर ४८ मधील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत मौ. वेतवडे, ता. पन्हाळा यांचेकडून पंचायत समिती, पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९६१-६२ साली बांधलेली आहे. सदरची इमारत मोडकळीस आलेली

असून इमारत नादुरूस्त असल्यामुळे दैनदिन कारभार करणे त्रासदायक होत असलेने, सदरची इमारत पाडून त्याठिकाणी नविन इमारत बांधकाम करणेचे नियोजन ग्रामपंचायतीने केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कडील मासिक सभा ठराव क्र.९, दि. ३०/०६/२०१६ व ग्रामसभा ठराव क्र. ९, दि. ०१/०५/२०१६ रोजीने ठराव करणेत आलेला आहे.

सदर इमारतीच्या भिंतीस तडे गेले आहेत. रुफकाम जीर्ण झालेले असून दरवाजे खिडक्या नादुरूस्त असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने इमारत निर्लेखन गरजेचे असलेबाबतचे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ या परिपत्रकातील सर्व अटीस अधीन राहून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत पुर्ण खराब असुन रुफकाम नाही भिंती अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत वेतवडे, ता. पन्हाळा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२४:- सौ.मिना सदानंद पाटील, सभापती, पं.स.गडहिंग्लज निवासस्थान भाडे मंजूरी बाबत. (सा.प्र.)**

**ठराव क्र. २६** **दिनांक - २३/०५/२०१७**

मा. सौ. मीना सदानंद पाटील , सभापती, पंचायत समिती गडहिंग्लज यांनी दि. २०/०१/२०१६ पासून श्री. मंदार सरदेसाई अयोध्या नगर १ ली गल्ली गडहिंग्लज यांची इमारत सभापती निवासस्थानासाठी भाडेने घेतली असून त्याप्रमाणे भाडे मंजूरीची मागणी केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदी नुसार प्रत्येक पंचायत समिती सभापतीस भाडे न घेता सुसज्ज असे निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन याबाबत जे नियम करील त्या नियमास अधिन राहून जि.प. स योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता देता येईल अशी तरतूद आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एसीडी/ १०८३/ सीआर/ ५५/ १३, दि.१८ मार्च १९८६ अन्वये मा. अध्यक्षसो यांना २०० चौ.मी. व जि.प. चे विषय समित्यांचे सभापती व पं.स. चे सभापती यांना १५० चौ.मी. पेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद आहे.

मा. सौ. मीना सदानंद पाटील , सभापती, पंचायत समिती गडहिंग्लज यांनी दि. ०२/०१/२०१६ पासून श्री. मंदार सरदेसाई अयोध्या नगर १ ली गल्ली गडहिंग्लज यांचे मालकीचे घर. ह्या इमारतीस र.रु. ४९९८/- (अक्षरी रुपये चार हजार नऊशे अठ्यानऊ फक्त) दरमहा भाडे निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी जा.क्र. ZP/WD/DB/WS/५१/२०१७ Date २५ /०१ /२०१७ ने प्रमाणपत्र दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील नियम ६९ (२) मधील तरतुदीनुसार सदर भाडे मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषदेचे आहेत. सदर निवासस्थान भाडे प्रस्तावास जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२५:-सौ.सुप्रिया सुधाकर साळोखे, सभापती, पं.स.राधानगरी निवासस्थान भाडे मंजूरी बाबत. (सा.प्र.)**

**ठराव क्र. २७ दिनांक - २३/०५/२०१७**

मा.सौ.सुप्रिया सुधाकर साळोखे सभापती, पंचायत समिती राधानगरी यांनी दि. २१/११/२०१६ ते १३/०३/२०१७ अखेर श्री. आनंदा शामराव चिबडे रा. राधानगरी ता. राधानगरी याची इमारत सभापती निवासस्थानासाठी भाडेने घेतलेली होती. त्याप्रमाणे भाडे मंजूरीची मागणी केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदी नुसार प्रत्येक पंचायत समिती सभापतीस भाडे न घेता सुसज्ज असे निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन याबाबत जे नियम करील त्या नियमास अधिन राहून जि.प. स योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता देता येईल अशी तरतूद आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एसीडी/ १०८३/ सीआर/ ५५/ १३, दि.१८ मार्च १९८६ अन्वये मा. अध्यक्षसो यांना २०० चौ.मी. व जि.प. चे विषय समित्यांचे सभापती व पं.स. चे सभापती यांना १५० चौ.मी. पेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद आहे.

मा.सौ. सुप्रिया सुधाकर साळोखे सभापती पंचायत समिती राधानगरी यांनी सभापती निवासस्थानासाठी श्री. आनंदा शामराव चिबडे रा. राधानगरी ता. राधानगरी यांचे मालकीचे घर. ह्या इमारतीस र.रु. ४१४४/- (अक्षरी रुपये- चार हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) दरमहा भाडे निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी जा.क्र.बाखा/रेशा/वशि/२२५/२०१७ दिनांक १९/०५/ २०१७ ने प्रमाणपत्र दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील नियम ६९ (२) मधील तरतुदीनुसार सदर भाडे मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषदेचे आहेत. सदर निवासस्थान भाडे प्रस्तावास जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२६:- श्री.दिलीप हरी कांबळे, सभापती, पं.स.राधानगरी निवासस्थान भाडे मंजूरी बाबत. (सा.प्र.)**

**ठराव क्र. २८ दिनांक - २३/०५/२०१७**

मा.श्री. दिलीप हरी कांबळे सभापती, पंचायत समिती राधानगरी यांनी दि. १५/०३/२०१७ श्री. आनंदा शामराव चिबडे रा.राधानगरी ता.राधानगरी याची इमारत सभापती निवासस्थानासाठी भाडेने घेतलेली आहे. त्याप्रमाणे भाडे मंजूरीची मागणी केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदी नुसार प्रत्येक पंचायत समिती सभापतीस भाडे न घेता सुसज्ज असे निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन याबाबत जे नियम करील त्या नियमास अधिन राहून जि.प. स योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता देता येईल अशी तरतूद आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एसीडी/ १०८३/ सीआर/ ५५/ १३, दि.१८ मार्च १९८६ अन्वये मा. अध्यक्षसो यांना २०० चौ.मी. व जि.प. चे विषय समित्यांचे सभापती व पं.स. चे सभापती यांना १५० चौ.मी. पेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद आहे.

मा. श्री. दिलीप हरी कांबळे सभापती पंचायत समिती राधानगरी यांनी सभापती निवासस्थानासाठी श्री. आनंदा शामराव चिबडे रा. राधानगरी ता. राधानगरी यांचे मालकीचे घर. ह्या इमारतीस र.रु. ४१४४/- (अक्षरी रुपये- चार हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) दरमहा भाडे निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी जा.क्र.बाखा/रेशा/वशि/२९६/२०१७ दि.१९/०५/२०१७ ने प्रमाणपत्र दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील नियम ६९ (२) मधील तरतुदीनुसार सदर भाडे मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषदेचे आहेत. सदर निवासस्थान भाडे प्रस्तावास जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२७:- प्रा.आ. उपकेंद्र कणेरीवाडी ता. करवीर येथे उपकेंद्र इमारत बाधणे. र.रू.४६,७७,१८९/- निविदा दर मंजूरी बाबत (बांधकाम)**

**ठराव क्र. २९** **दिनांक - २३/०५/२०१७**

बांधकाम विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर कडील विषयांकीत काम करणेसाठी ई-निविदा सुचना क्रमांक ५०/२०१६-१७ दिनांक १४.१०.२०१६ रोजी "http://mahatenders.gov.in" या संकेतस्थळवर प्रसिध्द करणेत आली. निविदा प्रसिध्दी व डाउपलोड कालावधी व ऑनलाईन Internet Banking द्वारे निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम सबमिशन कालावधी दिनांक१४.१०.२०१६ ते दिनांक २९.१०.२०१६ होता. सदरची ई-निविदा दिनांक ०४.११.२०१६ पासून इ.रोजी ऑनलाईन उघडणेत आली. सदर कामा करिता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

सदरची निविदा दिनांक **२७.०२.२०१७** रोजी निविदा कमिटी समोर उघडणेत आल्या त्यानुसार खालील प्रमाणे मक्तेदारांनी निविदा भरलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

वरील तीन निविदा धारकापैकी सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२२% कमी दराने म्हणजेच र.रू.४५,२६,५८४/- श्री. उदय आप्पासाो आवटे यांची आहे. कामाची निविदा रक्कम रु.४६,७७,१८९/- इतकी असून सदरची निविदा सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२२% कमी दराची म्हणजेच र.रु.४५,२६,५८४/- इतकी होते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १३९ (३) व ग्राम विकास व जलसंधारण विभाग शा. नि. क्र. झेडपीए- २०१२ /प्र.क्र. ६८०/वित्त-९ दिनांक.१९.०३.२०१२ मधील भाग- ५ नुसार श्री. उदय आप्पासाो आवटे यांचे नावे सदरची निविदा प्रशासकिय मंजूरीस अधिन राहून सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२२% कमी दाराची म्हणजेच र.रु.४५,२६,५४८/- ला मंजूरी देणेस हरकत नाही. असे सदरच्या निविदेस दि.२०.०३.२०१७ चे बांधकाम समितीने शिफारस केले आहे. यास्तव सदरच्या निविदेस स्थायी समितीची मंजूरी देणेत येत आहे. असे सर्वानुमते ठरले.

सुचक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
अनुमोदक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२८:- मोजे सुळकूड ता.कागल येथील पाण्याची टाकी निर्लेखन करणे बाबत (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. ३०** **दिनांक - २३/०५/२०१७**

ग्रामपंचायत मौजे सुळकूड, ता. कागल येथील पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत सुळकूड, ता. कागल यांनी दि. १८/०३/२०१७ रोजी पंचायत समिती कागलकडे सादर केलेला आहे.

सदर पाण्याची टाकी सन १९७८ मध्ये बांधलेली असून सद्या त्या टाकीस ३६ वर्षे पुर्ण झालेले असून सदर टाकीतून पाणी पुरवठा बंद आहे. सध्या पर्यायी नविन स्वजलधारा योजनेअंतर्गत गावास पाणी पुरवठा चालू आहे. सदरची टाकीचे कॉंक्रीट ठिसूळ होवून पडत असून पिलर्स कमकूवत झालेले असून गळती सूरू आहे. सदरची टाकी प्राथमिक शाळेच्या आवारात असून टाकी पडून जिवीतहानी होण्याची शक्यता आहे. सदरची जुनी जीर्ण नादुरूस्त पाण्याची टाकीचे निर्लेखन करून टाकी उतरविणेबाबत ग्राम पंचायत सुळकूडकडील मासिक सभा ठराव क्र.१३०, दि. १९/०३/२०१६ व ग्राम सभा ठराव क्रमांक ४, दिनांक ०१/०५/२०१६ ने ठराव पारित केलेला आहे. तसेच पंचायत समितीने ठराव क्र. ३९, दि.०३/०३/२०१७ ने टाकी निर्लेखन करून उतरविणेबाबत ठराव पारित केलेला आहे. उप अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा, उप विभाग, क्र. ३, कोल्हापूर व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी प्रस्तुत विषयी शिफारस केलेली आहे.

मौजे सुळकूड, ता. कागलकडील उंच पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत विहित कार्यपध्दती अवलंबणार असलेने व नियमानुसार निर्लेखनाची कार्यवाही करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२९:- कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील व्यायामशाळा (जिम्नॅशियम) लिपीक वर्गीय कर्मचारी संघटणेस चालविणेस दिलेचे अवलोकन करणे बाबत. (सा.प्र.)**

**ठराव क्र. ३१** **दिनांक - २३/०५/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषद मध्ये सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद पदाधिकारी /अधिकारी व कर्मचारी यांचे करीता जिम्नॅशियमचे साहित्य जिल्हा परिषद फंडातून खरेदी करणेत आले असून सदर जिम्नॅशियम ही सन दिनांक १५/७/२०१५ पासून कार्यन्वीत झाली आहे. सदर जिम्नॅशियम ही ना तोटा ना फायदा या तत्त्वावर चालविणेकरीता जिल्हा परिषद लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यांनी मागणी केले नुसार दिनांक १५/७/२०१५ पासून जिम्नॅशियम लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यांचेकडे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिले समक्ष सूचने नुसार हस्तांतरीत करणेत होती. मात्र जि.प. लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यांनी त्याबाबतचा करारनामा तयार करून देणत आला नव्हता. परंतू सदर जिम्नॅशियमचा ताबा हा जिल्हा परिषद लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यांचेकडेच असल्याने सदर बाबत त्यानी दिनांक १४ मार्च २०१७ इ. रोजी जिल्हा परिषद स्वनिधी मध्ये सन २०१६-२०१७ अखेरची रॉयल्टी म्हणून रक्कम रू. ५०००/- इतकी रक्क्म जिल्हा परिषद स्वनिधीमध्ये जमा केली आहे.

आता सदर जिम्नॅशियमबाबतचा करारनामा लिपीक वर्गीय कर्मचारी संघटनेने तयार केलेला आहे. सदरचा करारनामा ११ महिण्याकरीता असून तो दिनांक १५/४/२०१७ ते १५/३ /२०१८ अखेर लागू असेल. त्यानंतर दिनांक १५ मार्च २०१८ नंतर नवीन करारनामा तयार करून घेणे संबधित लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यास बंधनकारक राहील. जिम्नॅशियम करीता दयावे लागणारे मानधन, जिमची देखभाल दुरूस्तीसाठी झालेला खर्च त्याबाबतचे सर्व दायित्व हे जिल्हा परिषद लिपीक वर्गीय कर्मचारी संघटनेकडे असल्याने त्याचा हिशोब (जमा खर्च ) वित्त विभागाकडून तपासून वार्षिक अहवाल दिले नंतरच त्यापुढील आर्थिक वर्षाचा करार करून करणेत यावा. सदरचा प्रस्ताव विषय जिल्हा परिषद सर्व साधारण सभेसमोर अवलोकनार्थ ठेवणेस स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**आयत्यावेळी दाखल झालेले विषय पुढील प्रमाणे आहेत.**

**विषय क्र.३०:- शिपूर ता.चंदगड अंगणवाडी क्र.६५ इमारत बांधणे (बांधकाम)**

**ठराव क्र. ३२** **दिनांक - २३/०५/२०१७**

पंचायत समिती चंदगड कडील मौ.शिपूर ता.चंदगड अंगणवाडी क्र.६५ इमारत बांधणे या कामाचा मक्ता चेअरमन कलमेश्वर म.स.सं.म.कलिवडे ता.चंदगड. यांनी स्विकारला होता. सदरचे काम पूर्ण झालेले आहे. या कामातील महसुल जमा व्यपगत अनामत रक्कम रु. २९६९८/- त्यांच्या निरनिराळया बिलातुन वसुल करणेत आली होती. ती ३ वर्षावरील असलेने व्यपगत करुन महसुलात जमा करणेत आली आहे.

व्यपगत करुन महसुलात जमा करण्यात आलेली रक्कम महाराष्ट्र जि.प.व पं.स.लेखा संहिता १९६८ नियम २०९(८) नुसार मंजुरी देणेचे अधिकार स्थायी समितीचे आहेत. तरी सदरची व्यपगत करणेत आलेली रक्कम रु. २९६९८/- संबंधीतांना अदा करणेस मान्यतेसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३१:- निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर प्रशालेकडील तारेचे कंपाऊंड बांधकाम करणेच्या कामाला व खर्चाला प्रशासकिय मान्यता देणेबाबत. (शिक्षण प्राथमिक)**

**ठराव क्र. ३३** **दिनांक - २३/०५/२०१७**

जिल्हा परिषद, कोल्हापूर अतंर्गत दि. १४ जून २०१४ रोजी निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर येथे सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी जिल्हा परिषद, कोल्हापूरने रु. १५.०० कोटी रककम ठेव स्वरुपामध्ये ठेवली आहे. सदरच्या ठेवीवरील प्राप्त होणारे व्याजातून निवासी क्रीडा प्रशालेकडील विद्यार्थ्यांना / खेळाडूना उदा. अल्पोपहार आणि भोजन, निवासी इत्यादी सर्व सुविधा मोफत पुरविण्यात येत आहेत.

सन २०१७-२०१८ मध्ये एकूण शिल्लक असणाऱ्या रक्कमेतून विद्यानिकेतनकडे तारेचे कंपाऊंडचे बांधकाम करणेसाठी रु. ३१.०० लाख इतकी तरतुद मंजूर करण्यात आली आहे. शासन निर्णय दि. १९ मार्च २०१२ अन्वये रु. १०,००,००१ ते ३०.०० लाख रकमेपर्यंतच्या तरतुदीला प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार विषय समितीला आहेत. रु. १०,००,००१ ते रु. ५०.०० लाख इतक्या रकमेला प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार स्थायी समितीला आहेत. तसेच रु. १०,००,००१ ते रु. ५०.०० लाख रकमेपर्यंतच्या तरतुदीला तांत्रिक मान्यता देणेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर यांना आहेत. स्थायी समिती सभेमध्ये तारेचे बांधकाम करणे व होणारे खर्चास प्रशासकिय मान्यता घेणेसाठी शिक्षण समिती सभा दि. १२.०५.२०१७ अन्वये प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.तेव्हा दि. २३.०५.२०१७ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये रु. ३१.०० लाख रकमेच्या कामाला आणि खर्चाला प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
अनुमोदक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३२:- निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर प्रशालेकडील मैदान सपाटीकरण करणेसाठी तरतुद मंजूर करून खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत. (शिक्षण प्राथमिक)**

**ठराव क्र. ३४** **दिनांक - २३/०५/२०१७**

जिल्हा परिषद, कोल्हापूर अतंर्गत दि. १४ जून २०१४ रोजी निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर येथे सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी जिल्हा परिषद, कोल्हापूरने रु. १५.०० कोटी रककम ठेव स्वरुपामध्ये ठेवली आहे. सदरच्या ठेवीवरील प्राप्त होणारे व्याजातून निवासी क्रीडा प्रशालेकडील विद्यार्थ्यांना / खेळाडूना उदा० अल्पोपहार आणि भोजन, निवासी इत्यादी सर्व सुविधा मोफत पुरविण्यात येत आहेत.

प्रशालेकडील मैदान सपाटीकरण करुन ४०० मिटर ट्रॅक तयार करणेसाठी अंदाजे रक्कम रु. २.५० कोटी इतकी तरतुद आवश्यक आहे. तथापी सन २०१६-२०१७ मध्ये मैदान सपाटीकरण करणेसाठी जि.प. स्वनिधीमधून रु. ९०.०० लाख इतकी तरतुद मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी रु. ६४.७४/- लाख इतका निधी खर्च झालेला आहे. उर्वरित रु. २५.२६/- लाख इतक्या रकमेचे देयक अद्याप खर्ची पडलेले नाही. ते सन २०१७-२०१८ खर्ची पडणार आहे. तसेच सन २०१७-२०१८ मध्ये जि.प.स्वनिधीमधून रु. ६०.००/- लाख इतकी तरतुद मंजूर करण्यात आली आहे. तरीही मैदान सपाटीकरण करणेसाठी निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे निवासी क्रीडा प्रशालेकडील सन २०१७-२०१८ मध्ये प्राप्त होणार व्याज आणि शिल्लक रक्कम यामधून रु. ७०.०० लाख इतकी तरतुद मैदान सपाटीकरण करणेसाठी स्थायी समिती सभेच्या मान्यतेने जि.प.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेसाठी शिक्षण समिती सभा दि. १२.०५.२०१७ रोजीच्या सभेमध्ये रु. ७०.०० लाख इतक्या रकमेच्या कामाला प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावाबाबत स्थायी समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन या प्रस्तावास जि.प. सर्वसाधारण सभेची खर्चास प्रशासकिय मान्यता घेणेसाठी शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३३:- निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर प्रशालेकडील अल्पोपहार व भोजन खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत. (शिक्षण प्राथमिक)**

**ठराव क्र. ३५** **दिनांक - २३/०५/२०१७**

जिल्हा परिषद, कोल्हापूर अतंर्गत दि. १४ जून २०१४ रोजी निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर येथे सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी जिल्हा परिषद, कोल्हापूरने रु. १५.०० कोटी रककम ठेव स्वरुपामध्ये ठेवली आहे. सदरच्या ठेवीवरील प्राप्त होणारे व्याजातून निवासी क्रीडा प्रशालेकडील विद्यार्थ्यांना / खेळाडूना उदा० अल्पोपहार आणि भोजन, निवासी इत्यादी सर्व सुविधा मोफत पुरविण्यात येत आहेत.

सन २०१७-२०१८ मध्ये एकूण रक्कम रु. २.१२/- कोटी इतक्या रकमेचा नियोजित आराखडयाला उच्चस्तरीय धोरण व सनिंत्रण समिती सभा दि. १७.०४.२०१७ रोजीच्या सभेमध्ये मान्यता दिलेली असून सदरच्या आराखडयातील बाबनिहाय खर्चास प्रशासकिय मान्यता दिली आहे. सदरच्या नियोजित आराखडयामध्ये अल्पोपहार आणि भोजनासाठी रु. ८५.८० लाख इतकी तरतुद मंजूर करण्यात आली आहे.

शासन निर्णय दि. १९ मार्च २०१२ अन्वये रु. १०,००,००१ ते ३०.०० लाख रकमेपर्यंतच्या तरतुदीला प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार विषय समिती सभेला आहेत. रु. ३०,००,००१ ते रु. ५०.०० लाख रकमेपर्यंतच्या तरतुदीच्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार स्थायी समिती सभा आहेत. रु. ५०,००,००१ चे वरील रकमेच्या खर्चाच्या तरतुदीला प्रशासकय मान्यता देणेचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेला आहेत. तसेच तांत्रिक मान्यता देणेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर यांना असून रु. ५०,००,००१ चे

वरिल रकमेच्या खर्चास शासनाच्या संबंधित प्रशासकिय विभागाची तांत्रिक मान्यता घेणेच्या सुचना शासन निर्णय दि. १९ मार्च २०१२ अन्वये आहेत.

निवासी क्रीडा प्रशालेकडील विद्यार्थ्यासाठी अल्पोपहार आणि भोजनासाठी सन २०१७-२०१८ मध्ये रु. ८५.८० लाख इतकी तरतुद मंजूर करण्यात आली आहे. तसेच शिक्षण समिती सभा दि. १२.०५.२०१७ अन्वये खर्चास प्रशासकिय मान्यता देणेत आली आहे.

सदर प्रस्तावाबाबत स्थायी समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन या प्रस्तावास जि.प. सर्वसाधारण सभेची खर्चास प्रशासकिय मान्यता घेणेकामी शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३४:- ग्रा.पं.कसबा सांगाव ता.कागल यांना नळ पाणी पुरवठा दुरूस्ती करणेकामी कर्ज र.रु.२६,२२,०००/- मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. ३६** **दिनांक - २३/०५/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अक्र | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौ. कसबा सांगाव तालुका कागल | नळ पाणी पुरवठा करणे | ३४,९६,८०८/- | २६,२२,६०६/- | २६,२२,०००/- |

२/- वरील ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करण्यात यावी.

१. ग्रामपंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कम ग्रामपंचायत स्वतःच्या फंडातून खर्च करेल व ७५ टक्के रक्कम जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळेल.
२. वापरणेत येणारे साहित्य हे आय एस आय मार्कचे असावे.
३. कर्ज ज्या कारणासाठी मागणी केली आहे. त्याच कारणासाठी खर्च करणेत यावा दुसरीकडे खर्च करु नये.
४. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे. ५ टक्के आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५ टक्के खेरीज द.सा.द.शे. २ टक्के दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.
५. कर्ज परतफेड करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी.
६. कर्ज मिळाल्यापासून ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात यावे.

ग्राम पंचायत कसबा सांगाव तालुका कागल यांना वरील अटीस अधीन राहून नळ पाणी पुरवठा करणेकामी जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी जि.प.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत यावी ही विनंती

सुचक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३५:- विद्या मंदिर सोनवडे ता. शाहूवाडी शाळेच्या चार खोल्या निर्लेखन करणे. (शिक्षण प्राथमिक)**

**ठराव क्र. ३७** **दिनांक - २३/०५/२०१७**

वि. मं. सोनवडे ता. शाहुवाडी येथील प्राथमिक शाळेतील ४ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. शाहुवाडी गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खाली नमुद केले प्रमाणे ०४ खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या आहेत. व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला आहे. शिक्षण समिती सभा ठराव क्र. ६६ दि. ०२/०१/२०१७ अन्वये ४ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरचा विषय स्थायी समिती मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेची मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढील प्रमाणे आहेत.

| अ.न | तालुका | शाळेचे नांव | खोली संख्या |
|---|---|---|---|
| १ | शाहुवाडी | वि. मं. सोनवडे | ०४ |
| | | एकूण | ०४ |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०४ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे करीता स्थायी समितीची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३६:- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०१७-१८ विविध पशुवैदयकिय संस्थाना औषध पुरवठा करणे. (पशुसवंर्धन)**

**मा.सभापती (शिक्षण):-** पशुसंवर्धन विभागाच्या बाबतीत मी वेगळी चर्चा करतो. शिरोली ता.हातकणंगले कडील पशुवैधकिय दवाखान्यातील संबधित डॉक्टर हजर नसतात व त्यांचे कामकाज दवाखान्यातील अन्य कर्मचारी करीत असतो हे योग्य नाही.

**मा.अध्यक्ष:-** होय याबतची तक्रार माझ्याकडे देखील आलेली आहे तरी या बाबत सदर दवाखान्यात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी स्वत: भेट देवून माहीती घ्यावी.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** होय मी आवश्यक कार्यवाही करीत आहे.

**ठराव क्र. ३८** **दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करण्यात येते कि, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समिती कोल्हापूर कडील जा.क्र. जिवायो/कार्या-१८/जिवायोमंनि/१७-१८/८५५/२०१७ दि. १७/४/२०१७ अन्वये विविध पशुवैदयकिय दवाखान्यांना औषध पुरवठा करणे या सदरी रु. ११०.०० लक्ष तरतुद उपलब्ध असून सदर तरतुदीमधून जिल्हयातील सर्व पशुवैदयकिय संस्थांना दैनंदिन वापराची व अत्यावश्यक औषधे पुरवठा करावयाची असून सदर औषधे हि शासनाच्या व खात्याच्या भावबंद करारानुसार खरेदी करावयाची आहेत. सदर योजनेवरील तरतुदीस दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेमध्ये मान्यता आलेली आहे. जिल्हयातील

पशुवैदयकिय संस्थांना दैनदिन वापरासाठीची औषधे ही खात्याच्या भावबंद करार क्र. DDD/TENDER/595/3912016-17, PS-12 Aundh PUNE – 67 Dt. 19/03/2017 नुसार खरेदी करावयाची असुन सदर भावबंद करार ३१/३/२०१७ पर्यंत वैध आहे.

सदर औषधे खरेदीसाठी पशुसंर्धन व दुग्धशाळा समितीच्या दि.१५/५/२०१७ रोजीच्या सभेमध्ये स्थायी समिती मार्फत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेणेसाठी ठराव घेणेत आलेला आहे. या योजनेवरील तरतुद र. रु. ११०.०० लाखाची औषधे ही खात्याच्या भावबंद करारानुसार खरेदीस प्रशासकिय मंजूरीचे अधिकार शासन निर्णय क्र. झेडपीए/२०१२/प्र.क्र.६८०/ वित्त-९/मंत्रालय मुंबई नं.३२ दि.१९/०३/२०१२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद पं. स. लेखा सहीता १९६८ (नियम ४) नुसार मा. जिल्हा परिषद सर्व साधारण सभेस असल्याने दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस केलेप्रमाणे स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३७:- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०१७-१८ कामधेनु दत्तक ग्राम योजनेस वित्तीय मान्यता मिळणे बाबत. (पशुसवंर्धन)**

**ठराव क्र. ३९** **दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करणेत येते की, जिल्हा वार्षिक सर्व साधारण योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात कामधेनु दत्तक ग्राम ही योजना राबविणेत येत आहे. जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समिती कोल्हापूर कडील जा.क्र. जिवायो/कार्या-१८/जिवायोमंनि/१७-१८/८५५/२०१७ दि. १७/४/२०१७ अन्वये कामधेनु दत्तक ग्राम योजनेवर र. रु. १२८.१० लक्ष तरतुद उपलब्ध असून त्यामधून जिल्हयातील ८४ गावात ही योजना राबविणेची आहे. शासन निर्णय क्रं. नापुयो २०१०/प्र क्रं ५०/ पदुम ४/ मंत्रालय मुबई ३२, दि.२९ आक्टोंबर २०१० अन्वये योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना तसेच खात्याचे पत्र क्रं आयुक्त पशुसंवर्धन म.रा.पुणे १ याचे पत्र तसेच शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रं तापुयो २०१०/ प्र क्रं ५०/ पदुम ४ मंत्रालय मुबई ३२ शिबीर कार्यालय नागपूर दि.१६/१२/२०११ नुसार राबविणेत येत असुन या योजनेच्या एकुण १० बाबीवर या योजनेचे नियोजन करणेत येत आहे.

सदर योजनेसाठी जिल्हा वार्षिक सर्व साधारण योजना सन २०१७-१८ मध्ये या योजनेवर १२८.१० लाख तरतुद उपलब्ध करुन देणेत आली आहे. सदर तरतुदीस दि. २५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती मध्येमान्यता घेणेत आली असुन योजनेस वित्तीय व प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार जिल्हा परिषद सर्व साधारण सभेचे आहेत. र. रु. १२८.१० लक्ष निधी मधून ७८ गावामध्ये प्रती गाव रु.१,५२,५००/- या मर्यादेत खर्ची पडणार आहे. योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालील १० बाबीवर तरतुद खर्ची पडणार असुन त्याचे विवरण खालील प्रमाणे.

१.पशुपालक मंडळ स्थापन करणे वसहलीचे आयोजन करणे. -

८४ गावे X ७०००/- = रु ५,८८,०००/-

२.जंतनाशक शिबीरे –

८४ गावे X १७५००/-= रु.१४,७०,०००/-

३.खनिजद्रव्ये जिवनसत्वे पुरवठा-

८४ गावे X ४०,०००/- = रु.३३,६०,०००/-

४. गोचिड गोमाशि निमुर्लन –

८४ गावे X १३०००/- = रु.१०,९२,०००/-

५. वंधत्व निवारण शिबीरे व औषधउपचार शिबीरे-

८४ गावे X २२०००/- = रु.१८,४८,०००/-

६. वैरण विकास कार्यक्रम –

८४ गावे X १७०००/- = रु.१४,२८,०००/-

७. निकृष्ठ चारा सकस करणे-

८४ गावे X ५०००/- = रु.४,२०,०००/-

८. प्रसिध्दी व प्रचार -

८४ गावे X २१,०००/-= रु.१७,६४,०००/-

९. नाविन्यपुर्ण उपक्रंम राबविणे-

८४ गावे X ५०००/- = रु.४,२०,०००/-

१०. जनावरांचे मलमुत्र व्यवस्थापन व वाया गेलेल्या चाऱ्याचे खत व्यवस्थापन

८४ गावे X ५०००/- = रु.४,२०,०००/-

असे एकुण रु.१,२८,१०,०००/- तरतुद खर्ची पडणार असुन वरील पैकी जंत नाशके, खनितद्रव्ये गोचिड गोमशि निमुर्लन औषधे व वंधत्व व औषधोपचारासाठी औशध खरेदी, वैरणीसाठी बि बियाणे व वैरणीची ठोंबे व प्रसिध्दी व प्रचाराचे साहित्य या बाबी खरेदीची प्रक्रिया खात्याच्या भावबंद दर करार क्र. DDD/TENDER/595/3912016-17, PS-12 Aundh PUNE – 67 Dt. 19/03/2017 नुसार व शासकिय विहित पध्दतीचा अवलंब करुन मुख्यालया मार्फत करणेत येणार आहे. व उर्ववरीत उपक्रम राबविणेसाठी तरतुद हि पंचायत समिती स्तरावर वित्त प्रेशनाने आदा करणेत येणार आहे.

कामधेनु योजनेचा थोडक्यात सारांश,

| | | |
|---|---|---|
| १.पशुपालक मंडळ स्थापन करणे वसहलीचे आयोजन करणे. | - रु. ७०००/- | प्रति गाव |
| २.जंतनाशक शिबीरे | - रु. १७५००/- | प्रति गाव |
| ३.खनिजद्रव्ये जिवनसत्वे पुरवठा | - रु. ४००००/- | प्रति गाव |
| ४. गोचिड गोमाशि निमुर्लन | - रु. १३०००/- | प्रति गाव |
| ५. वंधत्व निवारण शिबीरे व औषधउपचार शिबीरे | - रु. २२०००/- | प्रति गाव |
| ६. वैरण विकास कार्यक्रम | - रु. १७०००/- | प्रति गाव |
| ७. निकृष्ठ चारा सकस करणे | - रु. ५०००/- | प्रति गाव |
| ८. प्रसिध्दी व प्रचार | - रु. २१०००/- | प्रति गाव |
| ९. नाविन्यपुर्ण उपक्रंम राबविणे | - रु. ५०००/- | प्रति गाव |
| १०. जनावरांचे मलमुत्र व्यवस्थापन व खत व्यवस्थापन | - रु. ५०००/- | प्रति गाव |
| एकुण रु. | - रु १५२०००/- | प्रति गाव |

वरीलपैकी क्र २, ३, ४ व ५ या बाबींवरील एकुण रु. ७७,७०,०००/- खर्च होणार असून बाब क्र. ६ बियाणे खरेदी वर र. रु. १४,२८,०००/- खर्च होणार आहे. अशी एकुण र.रु. ९१,९८,०००/- इतकी रक्कम मुख्यालयात खर्च पडणार असून रु. ३६,०२,०००/- इतकी रक्कम बाब क्र. १,७,८,९,१०,व क्र ६ मधील काही भाग या बाबींवर तालुकास्तरावर खर्च पडणार आहे. या योजनेवरील तरतुद र. रु. १२८.१० लाखा पैकी रु. ७७.७० लाखाची औषधे ही खात्याच्या भावबंद करारानुसार खरेदीस मान्यता तसेच रक्कम रुपये १२८.१० लाख च्या खर्चास तसेच प्रशासकिय व वित्तीय मंजुरीचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस असल्याने दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस

केलेनुसार स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण  सभेकडे शिफारस करणेत  येत आहे.

सुचक    :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३८:- अपघती  गोठा जळीत पशुधन हानीमध्ये अर्थसहाय्य. (पशुसवंर्धन)**

**ठराव क्र. ४०** **दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करणेत येते की, जिल्हा परिषद स्वनिधी योजनेंतर्गत सन  २०१७-१८ या आर्थिक वर्षात जि. प. स्वनिधीमधून अपघाती गोठा जळीत पशुधन हानीमध्ये अर्थसहाय्य या योजनेतंर्गत अपघातामुळे गोठ्यास आग लागून झालेल्या पशुधन हानीसाठी अर्थ सहाय्य दिले जाणार आहे. यासाठी मृत जनावराचा फोटो, स्थानिक वस्तूस्थितीजन्य पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, पोलीस पाटील / तलाठी व स्थानिक पशुवैद्यक यांचा अहवाल इ. कागदपत्रे विहित नमुन्यातील अर्जासोबत प.वि.अ. (विस्तार) यांचे मार्फत सादर करणे आवश्यक राहील.

जळीत मृत मोठ्या जनावरांसाठी रु. १००००/- व लहान जनावरांसाठी रु. ५०००/- व शेळया / मेंढ्यासाठी रु. ३०००/- याप्रमाणे नुकसान भरपाई अर्थसहाय्य मंजूर करता येईल.

एका पशुपालकास जास्तीतजास्त लहान मोठ्या ५ जनावरांच्या मर्यादेत अर्थसहाय्य देय राहील. या योजनेतंर्गत जि.प. सवनिधीतून सन २०१७-२०१८ अंतर्गत एकूण रु.७ .४५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

सदर नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास मंजूरी देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे असल्याने दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस केलेनुसार स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण  सभेकडे शिफारस करणेत  येत आहे.

सुचक    :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३९:- अनुसूचित जाती अपायोजना (१० + १ शेळी गट पुरवठा) प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी सन २०१७/१८ (पशुसवंर्धन)**

**ठराव क्र. ४१** **दिनांक - २३/०५/२०१७**

अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत ( विशेष घटक  योजना) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती / नवबौध्द कुटुंबाना शेळया मेंढयांचे गट पुरवणे या योजनेवर र. रु. ५०.०० लक्ष तरतुद वितरीत करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत १० अ १  शेळी गट पुरवठा करणेत येणार असुन ७५ टक्के अनुदानाची  रक्कम रु ५३४२९ होत आहे. सन २०१७-१८ मध्ये मंजुर नियतव्यय रु ५०.०० लक्ष मधुन जिल्हयातील  ९३ लाभार्थींना तालुका निहाय अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या आधारावर त्याप्रमाणात विभागुन तालुकानिहाय लंक्षाकानुसार लाभ देणेत येणार आहे.

सदर योजना राबवणेस पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि.१५/५/२०१७ ने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्र झेडपीए-२०१२/ प्र क्र  ६८०/ वित्त-९ मंत्रालय मुबई ३२ दि. ३१/१/२०१३ अन्वये रु.५०,०० लाखापर्यंतचे प्रशासकिय मंजुरीचे अधिकार स्थायी समितीचे आहेत.  तरी १० अ १ शेळी गट

पुरवठा करणे या योजनेवरील तरतुद र रु.५०.०० लक्ष खर्चास स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४०:- जि.प.स्वनिधीवर पशुवैधकिय दवाखाने ISO करणेसाठी अनुदान देणे. (पशुसवंर्धन)**

**ठराव क्र. ४२ दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करणेत येते की, जिल्हा परिषद स्वनिधी योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जि. प. स्वनिधीमधून जिल्हयातील एकुण १३७ पशुवैद्यकिय दवाखाने पैकी १३२ पशुवैद्यकिय दवाखान्यांना स्वतःच्या इमारती आहेत.

मा. अति. आयुक्त पशुसंवर्धन म. रा. पुणे यांचेकडील जा. क्र. व्हीएचडी / ७४ / ७४९ / २०१६ पसं.१२ औंध पुणे-७ दि. २/७/२०१६ अन्वये जिल्हयातील सर्व पशुवैद्यकिय संस्था ISO करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार पशुवैद्यकिय दवाखान्याचा परिसर स्वच्छता, इमारतीची किरकोळ दुरुस्ती, किरकोळ परिसर सुधारणा, आवश्यक फर्निचर, डीजीटल माहितीपत्रके, रेकॉर्ड वर्गीकरण व आवश्यक अनुषंगीक कामकाज व ISO नामांकनासाठीची फि या बाबी पूर्ण करुन पशुवैद्यकिय दवाखान्याचा गुणात्मक दर्जा वाढवून जास्तीत जास्त पशुपालकांपर्यंत दर्जेदार सेवा उलपब्ध करण्यासाठी दवाखाने ISO करणे प्रस्तावित आहे.

प्रति दवाखाना आवश्यकते प्रमाणे व मागणी प्रमाणे जास्तीतजास्त रु. २५०००/- याप्रमाणे रु. ३.०० लक्ष तरतूद खर्ची पडणार आहे.

या योजने अंतर्गत खालील निकषानुसार दवाखान्याची निवड करण्यात येणार आहे.

१. स्वमालकीच्या इमारती असलेले पशुवैद्यकिय दवाखाने २. दवाखान्यांचे वार्षिक तांत्रिक कामकाज समाधानकारक असावे. ३. संस्थाप्रमुखांचा व संस्थेकडील इतर कर्मचाऱ्यांच्या उत्स्फृत सहभाग असावा असे निवडीचे निकष आहेत.

सदर नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास मंजूरी देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस केलेनुसार स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४१:- जि.प.स्वनिधीमधून ५० टक्के अनुदानावर मुक्त संचार गोठा. (पशुसवंर्धन)**

**ठराव क्र. ४३ दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करणेत येते की, जिल्हा परिषद स्वनिधी योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जि. प. स्वनिधीमधून ५० टक्के अनुदानावर ही नाविन्यपूर्ण संकल्पना असून यामुळे जनावरांना खाण्याचे, पिण्याचे, मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य असणार आहे. यामुळे जनावरांमध्ये आपोआप १०-२० टक्के दुध उत्पादनात वाढ होणार आहे.

तसेच पशुपालकांना एकदा सकाळी गव्हाणीमध्ये चारा व पाणी टाकल्यानंतर पशुपालकांस जनावरांच्या काळजीसाठी न थांबता आपल्या शेतात काम करण्यासाठी वेळ मिळणार आहे. यामुळे जनावरांना पाहीजे तसे बसण्याचे ( उन / सावली ) स्वातंत्र्य राहणार असल्यामुळे जनावरांचे सांधेदुखी, Bed Score हे आजार कमी होण्यास मदत होणार आहे. जनावरांच्या मल-मुत्रापासुन उत्तम प्रकारच्या खताची निर्मिती होणार असून सभोवतालच्या जाळीमुळे भटक्या कुत्र्यांपासुन तसेच अन्य जंगली प्राण्यांपासुन आपोआपच संरक्षण होणार आहे.

सदर योजना अत्यंत उपयुक्त असून उत्पादनात वाढ करणारी व पशुपालकांच्या वेळेत बचत करणारी असल्यामुळे जिल्यामध्ये नाविन्यपूर्ण योजना म्हणून राबविण्यात येणार आहे.
सदर योजनेच्या गोटयासाठीचा प्रकल्प खर्च अंदाजे

**<u>प्रति गोठयासाठीचे खर्चाचे अंदाजपत्रक.</u>**

१. १२ जी. जाळी ५.५ फुट बाय १३२ फुट
२. १२ जी. जाळीस ५.५ बाय ३ फुट दरवाजा १ नग
३. ४ फुट लांब व ६ इंच/१२ इंच सिमेंट पाईप २ नग (पाणी व चारा गव्हाणीकरीता.)
४. ६.५ फुट उंचीचे ४०-४०-५ अँगल १६ नग
५. १० फुट बाय १ इंची पीव्हीसी पाईपचे २००/३०० लिटर क्षमतेच्या पिण्याचे पाण्याच्या टाकीला कनेक्शन १ नग
६.मजूरी अंदाजे रु.४०००/-
अंदाजे एकुण किंमत रु. ३०,०००/-

या योजनेतील लाभार्थी निवडीचे निकष १. पशुपालकाकडे किमान मोठी ५ दुधाळ जनावरे असावीत. २. लाभार्थीकडे सध्या असलेल्या गोठयाशेजारी स्वतःची किमान १००० चौ. फुट मोकळी जागा असावी. ३. मुक्त गोठा स्थापन स्वतः लाभार्थीने स्वखर्चाने पुर्ण केल्यानंतर अनुदानाची रक्कम (५० टक्के किंवा जास्तीतजास्त रु. १५०००/-) लाभार्थीचे खातेवर जमा करणेत येईल.

या योजनेवर तरतूद रक्कम रुपये २०.०० लाख असून, त्यामधून अंदाजे १३३ लाभार्थिंना लाभ देता येणार आहे. सदर नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास मंजूरी देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस केलेनुसार स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४२:- जि.प.स्वनिधीमधून ७५ टक्के अनुदानावर विधवा परित्याक्त्या व दारीद्रय रेषेखालील महिलांना २ शेळयांचे गट पुरवठा करणे. किंवा १०० टक्के अनुदानावर २० तलंगा गट वाटप करणे. (पशुसवंर्धन)**

**मा.सभापती (शिक्षण):-** शेळी व कोंबडी योजना स्वतंत्र करणेत यावी.

**ठराव क्र. ४४** **दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करणेत येते की, जिल्हा परिषद स्वनिधी योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जि. प. स्वनिधीमधून ७५ टक्के अनुदानावर विधवा परितक्त्या व दारीद्रय रेषेखालील महिलांना २ शेळयांचे गट पुरवठा करणे किंवा १०० टक्के अनुदानावर २० तलंगा गट वाटप करणेकामधेनु

दत्तक ग्राम ही नाविन्यपूर्ण योजना राबविणेत येत आहे. सदर योजनेवर जि. प. सेसफंड अंतर्गत १०.०० लक्ष रु. तरतुद उपलब्ध आहे. कोल्हापूर जिल्हयातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने दुग्धव्यवसाय, शेळीपालन व कुक्कुटपालन या व्यवसायावर अवलंबुन आहे. जिल्हयातील बहुतांशी ग्रामीण कुटुंबे हि या व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करतात. ज्या कुटुंबातील कर्ता नसतो व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना उदरनिवार्हाचे साधन पुरविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदर योजनेचे प्रारुप खालीलप्रमाणे आहे.

अ) दोन शेळयांची किंमत रु. ६००० X २ = १२०००

| | |
|---|---|
| विमा रक्कम | रु. ३३० |
| एकुण | रु. १२३३० |
| अनुदानाची रक्कम | रु. ९२४८ |
| लाभार्थी हिस्सा | रु. ३०८२ |

ब) २० कोंबडया (तलंगा)गट वाटप

१२ आठवडयाच्या तलंगा किंमत रु. १५० X २० = ३०००

कोंबडयांसाठी निवाऱ्याची व्यवस्था रु. १००० लाभार्थीने करावयाची आहे.

जिल्हयातील फक्त महिलांसाठीच सदर योजना असून विधवा परितक्त्या व दारीद्रय रेषेखालील महिलांना प्राधान्याने लाभ देण्यात येणार आहे. २ शेळयांचा गट ७५ टक्के अनुदानावर किंवा २० तलंगा गट १०० टक्के अनुदानावर देण्यात येणार असून शेळयांचा निवारा खाद्य व अनुषंगीक बाबी लाभार्थीकडून केल्या जातील तसेच कोंबडयांचा पिंजरा/ खुराडा, खाद्य व्यवस्था लाभार्थींनी स्वतः करणेचा आहे. २ शेळी गटापासुन वर्षातुन दोन वेळा किमान चार पिल्ली मिळाल्यास रु. ३२००० उत्पन्न अपेक्षित आहे. २० तलंगापैकी १० मादी व १० नर गृहीत धरल्यास मादी कोंबडयांपासुन सरासरी २१० अंडी याप्रमाणे २१०० अंडयापासुन रु. १६८०० उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच नर कोंबडयांच्या विक्रिपासुन रु. ५०० प्रति कोंबडा याप्रमाणे ५००० उत्पन्न अपेक्षीत आहे. याप्रमाणे १६५०० व ५००० असे २१५०० रुपये प्रतिवर्ष उत्पन्न अपेक्षित आहे. यामुळे आर्थिक स्थैर्य येण्यास मदत होईल. सदर नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास मंजूरी देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस केलेनुसार स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४३:- जि.प.स्वनिधीमधून १०० टक्के अनुदानावर बेवारस कुत्यांचे निर्बिजीकरण करणे. (पशुसवंर्धन)**

**ठराव क्र. ४५** **दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करणेत येते की, जिल्हा परिषद स्वनिधी योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जि. प. स्वनिधीमधून जिल्हयात एकुण साधारणतः ८८८०० मोठे पशुधन असुन शेळया मेंढयांची संख्याही मोठया प्रमाणात आहे. बेवारस कुत्र्यांचे चाव्यामुळे अंदाजे साधारणतः १००० ते २००० पशुधन बाधीत होते. त्यामुळे जनावरे पिसाळणे व पर्यायाने जनावरांच्या दुधाच्या सेवनामुळे मनुष्यहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बेवारस कुत्र्यांचे प्रमाण ग्रामिण भागात वाढत असून कुत्र्यांचे चाव्यामुळे मनुष्यास बाधा होण्याचे प्रमाणही बरेचशे आहे. भटक्या बेवारस कुत्र्यांची संख्या नियंत्रीत करण्यासाठी सध्या असलेल्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे, त्यांना कातडीचे आजार व जंतप्रादुर्भाव होवू नये यासाठी Inj Ivermectin देणे

व AntiRebis लस देणे हे सामाजिक बांधीलकी म्हणून क्रमप्राप्त आहे. यासाठी बेवारस कुत्र्यांचे निर्बिजीकरण हा नाविन्यपूर्ण उपक्रम जि. प. सेस योजना सन २०१७-१८ अंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत प्रति कुत्रा रु. १००० ते १२०० याप्रमाणे स्वयंसेवी संस्थेस कामाचा ठेका देवून ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे ग्रामीण भागातील बेवारस कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे यासाठी रु. ३.०० लक्ष तरतूद उपलब्ध आहे.

या योजनेअंतर्गत प्राधानाने,

१. निवडलेल्या गावातील सर्व बेवारस कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले जाईल.
२.निवडीसाठीचे गाव जि. प. अधिनस्त पवैद. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील असावे.
३.गावकऱ्यांचा उत्स्फृत सहभाग असावा.
४.ग्रामपंचायतीचा निर्बिजीकरण करणेबाबतचा ठराव.
५.निधीची उपलब्धता लक्षात घेवून तिर्थक्षेत्र / ऐतिहासिक/ प्रेक्षणीय स्थळांना प्राधान्य दिले जाईल. निवडलेल्या गावातील भटक्या बेवारस कुत्र्यांची संख्या नियंत्रीत करण्यासाठी सध्या असलेल्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे, त्यांना कातडीचे आजार व जंतप्रार्दुभाव होवू नये यासाठी Inj Ivermectin देणे व AntiRebis लस देवून मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणुन रेबीज सारख्या प्राणघातक रोगापासुन संरक्षण करणे.

सदर नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास मंजूरी देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस केलेनुसार स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :-मा.राहुल पांडुरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४४:- अनु.जाती उपायोजना वि.घ.यो. लाभार्थ्यांना ७५% अनुदानावर दोन दुभत्या जनावरांचा पुरवठा करणे. (पशुसवंर्धन)**

**सभापती (शिक्षण):-** या योजनेचा लाभ सर्वसामान्य माणसांपर्यत पोहचला पाहीजे. मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी लाभार्थी निवड करावी व सदर यादीची छाननी मा.सभापती (पशुसंवर्धन) यांनी करावी.

**मा.उपाध्यक्षः-** निकषात बसणारेच लाभार्थी घ्यावेत.

**मा.अरुणराव इंगवलेः-** मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांच्या स्तरावर निर्णय घ्यावेत तसेच निकषात बदल करावेत याबाबत मा.उपाध्यक्षांना अधिकार दयावेत.

**ठराव क्र. ४६** **दिनांक - २३/०५/२०१७**

सविनय सादर करणेत येते की, अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत ( विशेष घटक योजना) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अनु. जाती / नवबौध्द लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर २ दुभत्या जनावरांच्या गटांचा पुरवठा करणे या योजनेवर रु. १५०.०० लक्ष नियतव्यय मंजुर असुन प्रती लाभार्थी ७५ टक्के अनुदान दोन दुधाळ जनावरांसाठी र.रु. ६३,७९६/- देणेत येणार आहे. सदर अनुदानातुन जिल्हयातील २३५ लाभार्थीना दुधाळ जनावरे खरेदीसाठीं अनुदान देणेत येणार आहे. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या आधारावर तालुका निहाय लाभार्थी निवडणेत येणार असुन त्याप्रमाणे लक्षांक देण्यात येणार आहे.

सदर योजना राबवणेस पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि. १५/५/२०१७ ने मान्यता दिलेली आहे. तसेच दुभत्या जनावरांचा गटाचा पुरवठा करणे या योजनेवरील तरतुद र रु.१५०.०० लक्ष तरतुदीस शासन निर्णय क्र झेडपीए-२०१२/ प्र क्रं ६८०/ वित्त-९ मंत्रालय मुबई ३२ दि.३१ /१/२०१३ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस असलेने

दि. १५/५/२०१७ रोजीच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने शिफारस केलेनुसार स्थायी समितीची मान्यता देवून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
अनुमोदक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४५:- सन २०१६-१७ मधिल शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरसुचीमध्ये बदलेल्या दारास मान्यता मिळणे बाबत (बांधकाम)**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** दरसुची मधील बदलेल्या दरांना मान्यता घ्यावयाची आहे.

**मा.अरूणराव इंगवले:-** अंगणवाडी इमारतीची कामे वाळू उपलब्ध होत नसलेने थांबलेली आहेत सदरची कामे ठेकेदार करणेस नकार देतात व वाळूचे दर फार मोठयाप्रमाणात वाढलेले आहेत.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** यावर पर्याय म्हणून नवीण दर्जाचे ॲशब्रिक्स वापरणे गरजेचे आहे यासाठी वाळू कमी लागते.

**मा.अरूणराव इंगवले:-**या बाबत जाहिर प्रसिध्दी दयावी.

**मा.उपाध्यक्ष:-** या साठी गुणवत्ता नियंत्रण अधिकारी यांची मान्यता आवश्यक आहे काय?

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** अशी आवश्यकता नाही.

**ठराव क्र. ४७** **दिनांक - २३/०५/२०१७**

शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन २०१६-१७ ची मंजुर दरसुची पुस्तिका स्थायी समिती सभा ठराव क्र. ११६१ दि. १५/७/२०१६ अन्वये दि. ०१/०७/२०१६ पासून वापरणेस मंजूरी देणेत आली आहे.

मा. अधिक्षक अभियंता सा.बां. मंडळ पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. रेशा /दरसुची १५८३/२०१७ दि.१७/३/२०१७ अन्वये दरसुची २०१६-२०१७ मधील खालील बाबींचे दरामध्ये दुरूस्ती करून नविन सुधारित दर सन २०१६-२०१७ च्या दरसुची मध्ये समाविष्ठ करण्यासंबंधी निर्णय घेणेत आला आहे.

१) बाब क्र. १३ आय.बी./५ पान क्र. ६४
२) बाब क्र. ९ ए./६ पान क्र. ७४
३) बाब क्र. ९ बी./६ पान क्र. ७४
४) बाब क्र. १० बी./६ पान क्र. ७४
५) बाब क्र. २२/१७ पान क्र. ११९
६) बाब क्र. २३/१७६ पान क्र. ११९

वरील दुरूस्ती केलेले दर दरसुची मध्ये समाविष्ठ करून जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडील विकास कामांना लागू करणेस स्थायी समिती सभेची मंजूरी आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर विषयावर चर्चा होऊन स्थायी समिती सभेने मंजुरी दिली आहे.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४६:- ४ टक्के सादीलवार अनुदानातून लॅपटॉप पुरविणे. र.रु.४९.३५ लक्ष या योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत. (शिक्षण प्राथमिक)**

**मा.अरुणराव इंगवले:-** यासाठी लॅपटॉप, संगणक वापराचे प्रशिक्षण संबधित केंद्र पमुखांना देणे आवश्यक आहे. तसेच तासिका तत्वावर नेमणेत आलेल्या कणेरी व उचगांव कडील शिक्षकांना अध्यापही मानधन दिलेले नाही एकूण असे १९० शिक्षक कार्यरत आहेत.

**प्र.शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** या बाबत संपूर्ण माहिती उपलब्ध नाही. माहिती मागणी करून घेतो.

**मा.अरुणराव इंगवले:-** संबधित केंद्र प्रमुख / मुख्याध्यपकांना लेखी कळविणेत यावे व माहिती सत्वर उपलब्ध न झाल्यास संबधित दोषी कर्मचाऱ्याविरूध्द तात्काळ कारवाई प्रस्तावित करावी.

**ठराव क्र. ४८** **दिनांक - २३/०५/२०१७**

४ % सादिल खर्चाकरीता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदान मंजुरीचे आदेश दिनांक १७ जानेवारी २०१७ नंतरचे असलेने जिल्हा स्तरावरील खरेदीची रक्कम अखर्चित राहीलेली होती. सदरची रक्कम सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खर्च करणे करीता दि.०८/०५/२०१७ रोजी मा.शिक्षण संचालक, पुणे यांचेकडुन जिल्हास्तरावरील अखर्चित रक्कम रु. ७७,४१,०००/-(अक्षरी रक्कम रु.- सत्यात्तर लाख एक्केचाळीस हजार फक्त), खर्च करणेस परवानगी मिळाली आहे.

**४% सादिल अनुदानातुन लॅपटॉप पुरविणे बाबत.**

मा.शिक्षण संचालक, पुणे यांचेकडुन प्राप्त असणारे अनुदान जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळातील वेतनेत्तर बाबीवरच खर्च करावयाचे आहे. सदरचा खर्च दिनांक १४ नोंव्हेंबर १९९४ च्या शासन निर्णयानुसार करणेचा आहे. सदयस्थितीत शिक्षकांचे वेतन शालार्थ प्रणाली मधुन करण्यात येत आहे. प्रत्येक शाळेचे वेतन ऑनलाईन पध्दतीने करणे करीता मुख्याध्यपक यांना ज्या त्या शाळेचे आहरंण व सवितंरणअधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे. गट स्तरावर व इकडिल कार्यालयास माहितीची देवाण घेवाण करणे करीता लॅपटॉपची आवश्यकता आहे. शासन निर्णय दिनांक १० जुन २००२ च्या शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राथमिक शाळासाठी ४% सादिल अनुदानातुन जिल्हास्तरावर खरेदी करण्यायोग्य यादीमध्ये संगणक व त्यासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे बाबत सुचित केले आहे. त्यामुळे रक्कम रु.४९.३५ लाख इतक्या रक्कमेतुन उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहुन १७१ केंद्र शाळेना प्रत्येकी १ प्रमाणे लॅपटॉप वितरीत करावे असे दिनांक १२/०५/२०१७ रोजी झालेल्या शिक्षण समिती मध्ये ठरले आहे. त्यासाठी शिक्षण समिती ने दिनांक १२/०५/२०१७ व ठराव क्र. ८ ने मान्यता दिलेली आहे.

सदरची खरेदी ई-टेंडर व्दारे करावयाची झाल्यास दिनांक १९ मार्च २०१२ च्या व दिनांक ३१ जानेवारी २०१३ च्या श ासन निर्णयानुसार सदरच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीला व तांत्रिक मंजुरी चे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन या प्रमाणे योजना राबविणेस व होणा-या खर्चास स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-
निंबाळकर
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**चर्चेतुन करणेत आलेला ठराव**

**तासिका तत्वावरील शिक्षकांचे मानधन मंजूरी बाबत (शिक्षण (प्राथमिक)**

**ठराव क्र. ४९** **दिनांक - २३/०५/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील प्राथमिक शाळेमध्ये तासिका तत्वावर नेमणेत आलेल्या शिक्षकांना अध्यापही मानधन मिळालेले नाही. याबाबत सभागृहामध्ये चर्चा घेवून संबधित केंद्र प्रमुख / मुख्याध्यापक यांच्याकडून परीपुर्ण माहिती घेवून संबधित तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांचे मानधन त्वरीत अदा करावे याकामी माहिती देणेस दिरंगाई झालेस संबधितास जबाबदार धरून कारवाई करणे बाबत सर्वानुमते ठराव करणेत आला.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.राहुल पांडुरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४७:- जि.प.ग्रंथालयास मंजूरी मिळणे बाबत. (शिक्षण प्राथमिक)**

**प्र.शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** यासाठी जि.प. ग्रंथालय समिती नेमली आहे. ग्रंथालयात २६६३ पुस्तके आहेत. वार्षिक वर्गणी निश्चित करावयाची आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** या बाबत वेळोवेळी सभा घ्यावी.

**मा.अति.मु.का.अ.:-** पुस्तके वाचना बाबत जनजागृती होणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त पुस्तकांचा वापर झाला पाहीजे.

**मा.अध्यक्ष:-** जास्तीत जास्त पुस्तके वाचणाऱ्या पदाधिकारी /अधिकारी / कर्मचारी यांचा सत्कार करूया.

**मा.अरुणराव इंगवले:-** सभासद वार्षिक वर्गणी रुपये ३००/- असावी.

**ठराव क्र. ५०** **दिनांक - २३/०५/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वतीने पदाधिकारी , अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वाचनाची आवड निर्माण करण्याच्या हेतूने डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम ग्रंथालय सुरु करण्यांत आलेले आहे. सदर ग्रंथालयातील पुस्तकाच्या वापरांमुळे पदाधिकारी/अधिकारी व कर्मचारी यांना भरपूर फायदा होणार आहे .यास्तव समितीची उत्तम प्रकारे रचना करण्यांत आलेली आहे. यास शिक्षण समिती ने ठरावाव्दारे अलाहिदा मान्यता दिलेली आहे. यास्तव सदरच्या विषयास सभासद वार्षिक वर्गणी रुपये ३००/- असावी असे सूचित करुन सदरच्या विषयास स्थायी समितीची मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.विजया बाळासाहेब पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४८:- समाजकल्याण विभागाने सन २००७/०८ या आर्थिक वर्षात २०% जि.प. राखीव निधी व ३% अपंग कल्याण निधीमधून घ्यावयाच्या वैयक्तीक व सामुहीक लाभाच्या योजनांना प्रशासकिय मान्यता व पुर्नविलोकनास मान्यता बाबत.(समाजकल्याण)**

**मा.अरुणराव इंगवले:-** समाजकल्याण विभागामार्फत वैयक्तीक लाभाच्या विविध योजनेमधील लाभार्थीना मुदतवाढ दिली का दिली आहे?

**समाजकल्याण अधिकारी :-** अध्यापही सदर लाभार्थ्यांनी लाभ घेतलेला नाही.

**शिक्षण सभापती :-** जुनी यादी रद्द करावी त्यांना मुदतवाढ देवू नका.

**मा.विजया पाटील:-** माझ्या मतदार संघातील कोणत्याही लाभार्थ्यांना लाभ दिलेला नाही.

**मा.अरुणराव इंगवलेः-** माझ्या मतदार संघात एकाही लाभार्थ्यास झेरॉक्स मशिनचा लाभ दिलेला नाही.

**मा.अति.मु.का.अ.:-** सदर लाभार्थी निवड समितीने केलेली आहे.

**मा.अध्यक्षः-** आपण लाभार्थींना मुदतवाढ देताना पदाधिकारी यांना विश्वासत घेतले आहे काय?

**मा.अरुणराव इंगवलेः-** आम्ही आढावा बैठकीमध्ये सुचना देवून सुध्दा मुदतवाढ दिलेली आहे.

**मा.विजया पाटीलः-** कबनुर मध्ये एकही लाभार्थी सदर योजनेसाठी पात्र नाही काय?

**मा.सभापती (शिक्षण) :-** स्थायी समितीला अधिकार आहेत ही यादी रदद करा.
**मा.अध्यक्षः-** पहिल्या खाते प्रमुख व पदाधिकारी समन्वय सभेमध्ये आम्ही सुचना केलेल्या असताना देखील परस्पर मुदतवाढ का दिली हे योग्य आहे काय?

**समाजकल्याण अधिकारी :-** यापुर्वी एक महिना मुदत दिलेली होती.

**मा.अध्यक्षः-** हे आम्हांला माहीत असणे आवश्यक होते.सदर मुदतवाढ दुसऱ्यांदा का दिली, कोणाच्या सांगण्यावरून दिली?

**मा.अति.मु.का.अ.:-** सदर योजना अपंग व मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी आहे व १५% निधी खर्च होणे आवश्यक आहे व मुदतवाढीसाठी एक संधी देणे आवश्यक आहे.

**मा.उपाध्यक्षः-** पदाधिकारी यांना विश्वासात का घेतले नाही परस्पर प्रशासनाने का निर्णय घेतला हे योग्य नाही.

**समाजकल्याण अधिकारी :-** मा.सभापती, समाजकल्याण यांची मान्यता घेतली आहे.

**मा.सभापती, समाजकल्याण :-** सदर विषयाबाबतच्या टिपणीवर माझी स्वाक्षरी घेतली आहे व मा.मु.का.अ. यांच्या मान्यतेस सादर केले आहे तथापी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व पदाधिकारी यांना सदर विषया बाबत अवगत करणे आवश्यक होते. दि.१५ जून २०१७ अखेर शेवटची संधी देवून कार्यवाही पुर्ण करावी.

**मा.सभापती (शिक्षण) :-** या बाबत अंतिम मुदत दि.१५ जून २०१७ राहील.

**ठराव क्र. ५१** **दिनांक - २३/०५/२०१७**

समाज कल्याण विभागाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात २०% जिल्हा परिषद राखीव निधी व ३% अपंग निधीमधून खालीलप्रमाणे योजना हाती घेण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | तरतूद |
|---|---|---|
| | **अ) मागासवर्गीय व्यक्तींसाठी योजना** | |
| १ | मागासवर्गीय अनुदानित वसतीगृहांना सोलर वॉटर हिटर सिस्टीम पुरविणे | ३०,००,०००/- |
| २ | मागासवर्गीय वस्तीमध्ये खुली व्यायामशाळा उभारणे | ५०,००,०००/- |
| ३ | कोर्ट / वकील फी, संगणक खरेदी / दुरुस्ती, देखभाल, कार्यालयीन खर्च | ६,६१,०००/- |
| | **एकूण (अ)** | **८६,६१,०००/-** |
| | **ब) मागासवर्गीय महिलांसाठी योजना** | |
| ४ | इ. ५ वी ते १० वी च्या मागासवर्गीय मुलींना सायकल पुरविणे | ८०,००,०००/- |
| ५ | इ. ५ वी ते १० वी च्या मागासवर्गीय मुलींना शाळेत जाण्यासाठी वाहतुक भत्ता देणे | ४०,००,०००/- |
| | **एकूण ( ब)** | **१,२०,००,०००/-** |
| | **एकूण (अ+ब)** | **२,०६,६१,०००/-** |
| | **क) अपंग व्यक्तींसाठी योजना** | |
| ६ | अपंग व्यक्तींना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत अपंग व्यक्तीस व्हील चेअर देणे | ५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / राज्य स्तरावर स्पर्धेसाठी निवड होवून सहभागी झालेल्या ग्रामीण भागातील अपंग खेळाडूंना अर्थसहाय्य देणे | ५,००,०००/- |
| ८ | अपंग व्यक्तींना कॅन्सर, क्षयरोग, मेंदूचे विकार, हृदय शस्त्रक्रिया इ. दुर्धर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी अर्थसहाय्य देणे | २५,००,०००/- |
| ९ | अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी व्हेडींग स्टॉल टपरी पुरविणे | ७०,००,०००/- |
| १० | अपंगत्व प्रतिबंधात्मक पुनर्वसन व सोयी सुविधांबाबत प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती करणे | १०,००,०००/- |
| ११ | अपंग पालकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे | २०,००,०००/- |
| १२ | कोर्ट / वकील फी, संगणक खरेदी / दुरुस्ती, देखभाल, कार्यालयीन खर्च | ५,६३,०००/- |
| | **एकूण ( क)** | **१,४०,६३,०००/-** |
| | **एकूण (अ+ब+क)** | **३,४७,२४,०००/-** |

सदर योजनांबाबत मा.समाज कल्याण समितीच्या दि.०९/०५/२०१७ रोजी झालेल्या सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली असता मा.समाज कल्याण समितीने ठराव क्र.२ नुसार सदर सर्व योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून उपरोक्त योजनांपैकी खाली तक्त्यात रकाना क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या योजनांऐवजी त्यासमोर रकाना क्रं.४ मध्ये नमूद केलेल्या योजना पुर्नविनियोजनाद्वारे प्रस्तावित केल्या असून सदर पुर्नविनियोजनास मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यासाठीचा विषय मा.स्थायी समितीस सादर करणेचा निर्णय घेतला आहे.

| **अ.क्र.** | **मूळ अर्थसंकल्पातील योजनेचे नांव** | **मूळ तरतूद** | **सुधारीत योजनेचे नांव** | **सुधारीत तरतूद रक्कम** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| **१** | मागासवर्गीय अनुदानित वसतीगृहांना सोलर वॉटर हिटर सिस्टीम पुरविणे | ३०,००,०००/- | इ.५वी ते १० वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पुरविणे | ३०,००,०००/- |
| **२** | मागासवर्गीय वस्तीमध्ये खुली व्यायामशाळा उभारणे | ५०,००,०००/- | मागासवर्गीय वस्तीमध्ये खुली व्यायामशाळा उभारणे | ४५,००,०००/- |
| | | | समाजकल्याण समिती सदस्यांकरीता कामकाज निरीक्षण प्रशिक्षण अभ्यास दौरा | ५,००,०००/- |
| **३** | इ. ५ वी ते १० वी च्या मागासवर्गीय मुलींना सायकल पुरविणे | ८०,००,०००/- | इ. ५ वी ते १० वी च्या मागासवर्गीय मुलींना सायकल पुरविणे | ३०,००,०००/- |
| | | | मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत दळप सयंत्र पुरविणे | २५,००,०००/- |
| | | | दारिद्रय रेषेवरील मागासवर्गीय महिला बचत गटांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण-३०दिवसांचा कोर्स | २५,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | १. फॅशन डिझायनिंग कोर्स<br>२. ब्युटी पार्लर कोर्स<br>३. कुकिंग कॅटरींग कोर्स | |
| ४ | इ. ५ वी ते १० वी च्या मागासवर्गीय मुलींना शाळेत जाण्यासाठी वाहतुक भत्ता देणे | ४०,००,०००/- | मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत शिलाई मशिन पुरविणे<br><br>मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत पिको फॉल मशिन पुरविणे | २५,००,०००/-<br><br>१५,००,०००/- |
| ५ | अपंग व्यक्तींना कॅन्सर, क्षयरोग, मेंदूचे विकार, हृदय शस्त्रक्रिया इ. दुर्धर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी अर्थसहाय्य देणे | २५,००,०००/- | अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत दळप सयंत्र पुरविणे | २५,००,०००/- |
| ६ | अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी व्हेडींग स्टॉल टपरी पुरविणे | ७०,००,०००/- | अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत झेरॉक्स मशिन पुरविणे<br><br>अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत मिरची कांडप मशिन पुरविणे | ५०,००,०००/-<br><br>२०,००,०००/- |
| | **एकूण** | **२,९५,००,०००/-** | | **२,९५,००,०००/-** |

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. झेडपीए- २०१२/ प्र.क्र. ६८/ वित्त-९, दि. १९ मार्च २०१२ नुसार रक्कम रु. ३०,००,०००/- पर्यंतचे योजनेस मंजूरीचे अधिकार विषय समितीस, र.रु. ३० ते ५०,००,०००/- पर्यंतचे अधिकार स्थायी समितीस व र.रु. ५०,००,०००/- लाखावरील प्रशासकीय मंजूरीचे अधिकार जि.प. सर्वसाधारण सभेस व तांत्रिक मंजूरीचे अधिकार मा. आयुक्त, समाजकल्याण / अपंग कल्याण पुणे यांना आहेत.

तरी वरील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील समाजकल्याण समितीकडील र. रु. ३०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना, समाजकल्याण समितीची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असून रु. ३०,००,०००/- वरील योजनांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीसाठी व योजना राबविणेसाठी तसेच मा.समाजकल्याण समितीने दि.०९/०५/२०१७ च्या मासिक सभेत ठराव क्रं.२ अन्वये केलेल्या पुर्नविनियोजनास स्थायी समितीची मंजूरी असून जि. प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४९:- प्रा.आ.केंद्र हलकर्णी ता.गडहिंग्लज अंतर्गत उपकेंद्र बुगडीकटटी येथे नविण उपकेंद्र इमारत, सरंक्षण भिंत इ. बांधणे र.रु.५७,१३,५५५/- (बांधकाम)**

**ठराव क्र. ५२** **दिनांक - २३/०५/२०१७**

बांधकाम विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर कडील विषयांकीत काम करणेसाठी फेर ई-निविदा सुचना क्रमांक ८२/२०१६-१७ दिनांक २७.१२.२०१६ रोजी "http://mahatenders.gov.in" या संकेतस्थळवर प्रसिध्द करणेत आली. निविदा प्रसिध्दी व डाउपलोड कालावधी व ऑनलाईन Internet Banking द्वारे निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम सबमिशन कालावधी दिनांक २७.१२.२०१६ ते दिनांक २१.०१.२०१७ होता. सदरची ई-निविदा दिनांक २३.०१.२०१७ पासून इ.रोजी ऑनलाईन उघडणेत आली. सदर कामा करिता खालील प्रमाणे मक्तेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

सदरची निविदा दिनांक १७.०४.२०१७ रोजी निविदा कमिटी समोर उघडणेत आल्या त्यानुसार खालील प्रमाणे मक्तेदारांनी निविदा भरलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |

वरील निविदा धारकापैकी श्री. विलास भावकु पाटील रा. बसर्गे ता. चंदगड जि. कोल्हापूर यांची निविदा सर्वात कमी म्हणजेच सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०५ % जादा दराची आहे. सदरच्या कामाची सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०५% जादा दराने म्हणजेच र.रू.५७,७३,५४७/- ने कामकरणेस तयारी दर्शवीली आहे. महाराष्ट्र जि.प.व पं.स.लेखा सहिता १९६८ भाग ५ नियम १३९ (१) मधील (तीन) नुसार प्रत्येकी वीस लक्ष पेक्षा अधिक व एक कोटी रूपया पर्यंत खर्चाच्या बांधकामासाठी २% किंवा १ मंजूर अंदाजावरील खर्चाची जादा रक्कम ही पोट-नियम (१) मध्ये विहित केलेल्या रक्कमेपेक्षा अधिक असेल तेव्हा सुधारित अंदाज तयार करण्यात येतील आणि ते मुळ अंदाज असल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल त्या नुसार सदरची निविदा मंजूर करणेचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा यांचे आहेत.

सदरच्या कामांची प्रशासकीय मान्यता र.रू.५९,९८,००१/- इतकी असलेने सदरच्या कामांची निविदा प्रशासकीय मान्यतेस अधिन राहून सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०५% जादा दराची म्हणजेच र.रू.५७,७३,५४७/- ला श्री. विलास भावकु पाटील रा. बसर्गे ता. चंदगड जि. कोल्हापूर यांचे नावे महाराष्ट्र जि.प.व पं.स.लेखा सहिता १९६८ मधील नियमानूसार प्रशासकिय मंजूरीस अधिन राहून मंजूरी देणेस हरकत नाही. सदरची निविदा ही ग्राम विकास व जलसंधारण विभाग शा. नि. क्र. झेडपीए- २०१२ /प्र.क्र. ६८०/वित्त-९ दिनांक.१९.०३.२०१२ मधील भाग- ५ नुसार मा.बांधकाम समितीचे शिफारशीने जि.प. सर्वसाधारण सभेत मंजूर करणेस सादर करणेची आहे. त्यानुसार श्री. विलास भावकु पाटील रा. बसर्गे ता. चंदगड जि. कोल्हापूर यांचे नावे र.रु.५७,७३,५४७/- ला मंजूरी देणेकामी सदरच्या निविदेस दि.१२.०५.२०१७ चे बांधकाम समितीने शिफारस केले आहे. तरी सदरची निविदा ही स्थायी समितीचे शिफारशिने जि.प. सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेसाठी सादरकरणेची आहे. यास्तव सदर निविदेस स्थायी समितीची शिफारस करणेत येत आहे. असे सर्वानुमते ठरले.

सुचक :- मा.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५०:- शिरोळ ग्रामपंचायतीस नगरपरिषदेचा दर्जा देणे बाबत (ग्रामपंचायत)**

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** सदरचा विषय आयत्यावेळी दाखल झालेला आहे हा विषय पुढील सभेत विषय पत्रिकेत समाविष्ठ करून घेणेत यावा.

**विषय क्र.५१:- स्थानिक निधी लेखा परिक्षण सन २०१४-१५ परिच्छेदांची प्राथमिक उत्तरे अवलोकनी येवून जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणे बाबत.(सा.प्र.)**

**ठराव क्र.५३** **दिनांक - २३/०५/२०१७**

समान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर कडील सन २०१४-१५ चे स्थानिक निधी लेखा परिक्षण झाले असून एकूण २७ परिच्छेद घेणेत आलेले आहेत.

सदर शकांचे प्राथमिक अनुपालन सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा कोल्हापूर यांचेकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे. सदर परिच्छेदांची प्राथमिक उत्तरे संबंधित खातेप्रमुख व संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडुन प्राप्त करुन घेणेत आलेली आहेत. सदरचे अनुपालन स्थायी समिती सभेत अवलोकनी येवून जिल्हा परिषद सर्व साधारण सभेचे मान्यतेने सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोल्हापूर या विभागाकडे पाठविणेचे आहेत. तरी सदरचा विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेसाठी स्थायी समिती शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.राहुल पांडूरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५२:- ग्रा.पं. कासारवाडा ता.राधानगरी यांना जिल्हा ग्राम विकास निधीमधून वैयक्तीक नळांना वॉटर मिटर्स बसविणेसाठी कर्ज रक्कम रुपये ६,०४,०००/- मंजूर करणे बाबत.**

**ठराव क्र.५४** **दिनांक - २३/०५/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अ.क्र | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.पं.कासारवाडा ता.राधनगरी | वाटर मिटर्स बसविणे | ८,०५,५६९/- | ६,०४,१७७/- | ६,०४,०००/- |

२/- वरील ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करण्यात यावी.

१. ग्रामपंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कम ग्रामपंचायत स्वतःच्या फडातून खर्च करेल व ७५ टक्के रक्कम जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळेल.
२. वापरणेत येणारे साहित्य हे आय एस आय मार्कचे असावे.
३. कर्ज ज्या कारणासाठी मागणी केली आहे. त्याच कारणासाठी खर्च करणेत यावा दुसरीकडे खर्च करु नये.
४. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे. ५ टक्के आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५ टक्के खेरीज द.सा.द.शे. २ टक्के दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.
५. कर्ज परतफेड करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी.
६. कर्ज मिळाल्यापासून ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात यावे.

ग्राम पंचायत कासारवाडा तालुका राधानगरी यानां वरील अटीस अधीन राहून वॉटर मिटर्स बसविणेसाठी जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी जि.प.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत यावी ही विनंती

सुचक :- मा.राहुल पांडूरंग पाटील
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.शिक्षण सभापती:-** जिल्हा परिषदेच्याऔषध भांडारास मी व मा. इंगवले साहेब यांनी भेट दिली असता सदर ठिकाणी अस्ताव्यस्त औषधसाठा तसेच मुदतबाहय झालेली औषधे दिसून आली. या विभागात गेली ८ वर्षे एक कर्मचारी काम करत आहे. तो कर्मचारी इतक्या कालावधीसाठी तेथे कसा काय कामकाज करत आहे? या बाबत दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात बातम्या कश्याकाय प्रसिध्द होतात. याची माहीती तात्काळ दया.

**मा.अरुणराव इंगवले:-** सावर्डे, शिरोली प्रा.आ.केंद्रांत मुदतबाहय औषधे सापडलेने आम्ही जि.प.च्या औषध भांडारास भेट दिली असता याठिकाणी देखिल अस्ताव्यस्त औषधसाठा तसेच मुदतबाहय झालेली औषधे दिसून आली. याबाबत लगेच दुसऱ्या दिवशी उलट- सुलट बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्या.

**मा.शिक्षण सभापती:-** या बाबतची बातमी पत्रकारांना कोणी पुरविली याचा शोध घ्यावा व संबधितावर कारवाई करावी.

**मा.अध्यक्ष:-** यापुर्वीच आम्ही वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द करीत असताना ज्याला बातमी दयावयाची आहे त्यांनी स्वतःचे नाव घालून बातमी प्रसिध्द करावी अशा सुचना दिलेल्या आहेत.

**मा.अरुणराव इंगवले:-** औषध भांडारात त्या कर्मचाऱ्यास आठ वर्षे ठेवण्यामध्ये कोणाचा इंटरेस्ट आहे ?

**जिल्हा आरोग्य अधिकारी:** मी या बाबत परीपुर्ण माहिति घेतो व कार्यवाही करतो.

**मा.अरुणराव इंगवले:-** आरोग्य विभागाकडे सॅनिटरी नॅपकिन मोठया प्रमाणात वाटपा शिवाय पडून आहेत त्याचे वाटपाचे वेळीच नियोजन करून योग्य, गरजू शाळांतील मुलींना वाटप करावेत.

**मा.शिक्षण सभापती:-**सॅनिटरी नॅपकीन वाटपासाठी गरजू गरीब मुली, विध्यार्थीनींना वाटपा बाबत सत्वर नियोजन करावे.

**मा.अरुणराव इंगवले:-** पुणे राज्यसभा खासदार निधीतून तिन तलावांची गाळ काढणेची कामे झाली आहेत हि काय योजना आहे.

**कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू):-** या बाबतची माहीती घेवून सांगतो.
मा.सभापती (म.बा.क.) :- जैनापुर ता.शिरोळ येथील ग्रामपंचायत इमारती समोर सांडपाणी साठते आहे या बाबत काय करणार?

**कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू):-** सदरची कामे पाणी पुरवठा विभागाकडून केली जात नाहीत सांडपाणी व्यवस्थापन त्या संबधीत ग्रामपंचायतीकडून केले जाते.

**मा.विजया पाटील:-** ग्रामपंचायत साजणी ता.हातकणंगले कडील चौकशी प्रकरणाचे काय झाले? ग्रामपंचायत अपहार महाजल योजनेमध्ये गैरव्यवहार झाला आहे तसेच मुरूम कामावर बेकायदेशिरपणे पैसे अदा करणे व तंटामुक्त बक्षीस रक्कम नियमबाहय व बेकायदेशिररित्या खर्च केलेली आहे या बाबत संबधितांवर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा.

**उप मु.का.अ.(ग्रा.पं.):-** या बाबत सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर ५०% प्रमाणे वसुलीची जबाबदारी निश्चित केलेली आहे. खाते निहाय चौकशी सुरू आहे.
**मा.अरुणराव इंगवले:-** फौजदारी गुन्हा दाखल करावा.

**मा.विजया पाटील**:- कबनुर जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सुध्दा भ्रष्टाचार झलेला आहे पण पुढील कारवाई झाली नाही.

**उप मु.का.अ.(ग्रा.पं.):-** सदरची योजना ८ ते ९ वर्षापुर्वी राबविणेत आली असून ग्रामपंचायतीने ताब्यात घेतलेली नाही या बाबत चौकशी समिती नेमली आहे त्या बाबतचा अहवाल प्राप्त आहे व गट विकास अधिकारी यांचे अभिप्राय पाहून पुढील कार्यवाही चालू आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** ग्रामपंचायतील अधिक अधिकार दिलेने हे घडलेले आहे.

**मा.विजया पाटील:-** संबधितांना जबाबदार धरून कारवाई करावी.

**मा.अध्यक्ष:-** सदरची बाब योग्य असेल तर संबधितांवर कारवाई करावी.

यानंतर मा.उपाध्यक्ष यांनी सभेस उपस्थित असलेले सर्व पदाधिकारी, सदस्य, सर्व अधिकारी व खाते प्रमुख यांचे आभार मानले. तद्नंतर मा.अध्यक्ष यांनी सभा खेळीमेळीत चालवणेस सहकार्य केले बद्दल सर्वांचे आभार मानून सभा संपलेचे जाहीर केले.

कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला दिनांक २३/०५/२०१७

**( एम.एस.घुले )**
**सचिव तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**(शौमिका महाडिक)**
**सभापती स्थायी समिती तथा**
**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद,कोल्हापूर**